१९३७-२०२६
९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड मंगळवार । दि. ६ ऑक्टोबर २०२६ । अंक १२० । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### बोटींच्या धडकेत ३० जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** कांगो नदीत दोन मोटरचालित लाकडी बोटींची जोरदार धडक होऊन झालेल्या दुर्घटनेत ३० जणांचा मृत्यू झाला. मृतांचे मृतदेह नदीतून बाहेर काढून अंत्यसंस्कार करण्यात आले असून अनेक जण बेपत्ता असल्याची माहिती आहे. ही दुर्घटना रविवारी इक्वेटर प्रांतातील नगोम्बे–लुकोलेला भागाजवळ घडली. एक बोट उबांगुईहून किंशासाकडे, तर दुसरी किंशासाहून लुकोलेलाकडे जात होती. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. बेपत्ता प्रवाशांचा शोध घेण्यासाठी बचाव पथकांकडून नदीत शोधमोहीम सुरू आहे.

### परीक्षा न देताच वैद्यकीय प्रमाणपत्र

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पेपरफुटी प्रकरणाची चर्चा सुरू असतानाच वैद्यकीय क्षेत्रातील बनावट प्रमाणपत्रांचे प्रकरण समोर आले आहे. परदेशातून वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या उमेदवारांनी आवश्यक परीक्षा उत्तीर्ण न होताच वैद्यकीय नोंदणी प्रमाणपत्र मिळवल्याचे तपासात उघड झाले आहे. महाराष्ट्र सायबर पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत तिघांना अटक केली आहे. बुलढाण्यातील वरुण आखाडे आणि संकेत उन्हाळे यांच्यासह नाशिकमधील राहुल पाटील यांचा त्यात समावेश आहे. राहुल पाटील याने सुमारे १५ ते २० उमेदवारांसाठी बनावट गुणपत्रिका, प्रमाणपत्रे व अन्य कागदपत्रे तयार केल्याचा पोलिसांचा संशय आहे.

## वेधक

### १६ ऑक्टोबरपासून राज्यात पाणीकपात

**मुंबई :** अल निनोच्या प्रभावामुळे राज्यात यंदा पर्जन्यमानात मोठी घट झाली असून, राज्यातील जलसाठा मर्यादित आहे. या संभाव्य दुष्काळसदृश्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलसंपदा विभागाने ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंतचे पाण्याचे धरणनिहाय व वापरनिहाय अत्यंत सूक्ष्म नियोजन केले आहे. राज्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही टंचाई भासू नये, यासाठी पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून, १६ ऑक्टोबर २०२६ पासून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किमान १० टक्के पाणीकपात लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती जलसंपदा मंत्री पान २ वर

### टँकरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**चणेरा :** रोहा तालुक्यातील बारसोली गावाच्या वळणावर दारूच्या नशेत टँकर मागे घेताना झालेल्या अपघातात तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी रात्री घडली. अपघातानंतर पळून जाणाऱ्या टँकरचालकाला नागरिकांनी पाठलाग करून पकडले. सोहनलाल कानिया मीना (३४, रा. डुंगारपूर, राजस्थान) हा आरजे–५८–जीए–०१४१ क्रमांकाचा टँकर बारसोली गावाच्या वळणावर मागे घेत होता. यावेळी त्याच्या निष्काळजीपणामुळे टँकरची धडक बसून अजय सुभाष सरकार या तरुणाचा मृत्यू झाला. अजय हा मूळचा पश्चिम बंगालचा असून, धाटाव येथे राहात होता. अपघातानंतर चालकाने घटनास्थळी न थांबता पान २ वर

### ब्रेक निकामी ट्रकची धडक



**पाताळगंगा :** मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील बोरघाटात खोपोली बाहेर पडण्याच्या ठिकाणाजवळ सोमवारी सकाळी ब्रेक निकामी झालेल्या ट्रकने पुढील ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात चालक व मदतनीस जखमी झाले. पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या केए २५ डी ६९४९ क्रमांकाच्या पान २ वर

### अंबा नदी पुलावर टँकरचा अपघात



**नागोठणे :** रिलायन्स कंपनीतून मुंबईकडे निघालेल्या कॅप्सूल टँकरचा सोमवारी सकाळी ६.३०च्या सुमारास नागोठणे येथील अंबा नदी पुलावर अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने टँकर पुलाच्या कठड्यावर आदळून अडकला. कठडा मजबूत असल्याने टँकर नदीत कोसळला नाही आणि सुदैवाने जीवितहानी टळली. अपघाताची माहिती मिळताच रिलायन्सचे सुरक्षा कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. मात्र, त्यांनी पोलिसांना माहिती दिली नसल्याचा पान २ वर

## शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांवर संकट

# भात उत्पादनात घट?

प्रमोद जाधव
। रायगड ।

**यंदा उशिरा पडलेल्या आणि ऐन हंगामात गायब झालेल्या पावसाचा मोठा फटका जिल्ह्यातील भातपिकांना बसला आहे. बहरलेल्या भातपिकांना सध्या पावसाची नितांत गरज असताना पावसाने दडी मारल्याने भाताची रोपे पिवळी पडू लागली आहेत. शेतजमिनीला भेगा पडू लागल्या असून, पिके संकटात सापडली आहेत. या कालावधीत पावसाचा खंड पडल्यास भाताच्या उत्पादनात साधारणपणे २० ते ३० टक्के घट होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत.**



- उशिरा पडलेल्या आणि गायब झालेल्या पावसाचा फटका
- गतवर्षीच्या तुलनेत भात लागवडीचे क्षेत्र १२ हजार ८९९ हेक्टरने घटले

सात जूनला पडणाऱ्या पावसाने यंदा तब्बल १५ दिवस उशिराने जिल्ह्यात हजेरी लावली. त्यामुळे शेतकरी वर्ग सुखावून गेला आणि भात पेरणीची लगबग सुरू झाली. मात्र, त्यानंतरच्या पावसाने शेतकऱ्यांची घोर निराशा केली. २२ जूनपासून सुरू झालेला पाऊस आठ जुलैपर्यंत सुरू राहिल्याने भात पेरणीवर मोठा परिणाम झाला. जिल्ह्यातील दहा हजार ५२४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, २४ हजार ९४७ शेतकऱ्यांना त्याचा फटका बसला. यातील काही शेतकऱ्यांनी स्वतःला सावरत दुबार पेरणी केली.

जिल्ह्यातील पिकाखालील असलेल्या ८७ हजार ५३६ हेक्टर क्षेत्रापैकी ६१ हजार १०१ हेक्टर क्षेत्रावर भात लागवड करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली. गतवर्षी साधारणपणे ७४ हजार हेक्टर क्षेत्रात भातपिकाची लागवड झाली होती. यावर्षी भातपिकाच्या लागवडीत १२ हजार ८९९ हेक्टरने घट झाल्याचे कृषी विभागाकडून मिळालेल्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

जुलैच्या पहिल्या आठवड्यानंतर दुसऱ्या आठवड्यात काही प्रमाणात पाऊस पडला. मात्र, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अपेक्षित पाऊस झाला नाही. त्याचा परिणाम जिल्ह्यातील डोंगर भागासह पठारावरील भातपिकांवर झाला आहे. पावसाअभावी भातपिके पिवळी पडण्याची भीती निर्माण झाली असून, शेतांमध्ये पाणी नसल्याने काही ठिकाणी जमिनीला भेगा पडल्या आहेत. त्यामुळे भातपीक मोठ्या संकटात सापडले आहे.

सप्टेंबर महिना संपून आता ऑक्टोबर महिना सुरू झाला आहे. या आठवड्यात पाऊस पडल्यास भातपिके व्यवस्थित राहू शकतात, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. मात्र, पावसात पुन्हा खंड पडल्यास भात उत्पादनात २० ते ३० टक्के घट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पावसाने दडी मारल्याने जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. जिल्ह्यातील काही ठिकाणी भातपिकाला कणश्या येऊ लागल्या आहेत, तर काही ठिकाणी भातपीक बहरले आहे. मात्र, या अवस्थेत पाऊस न पडल्यास त्याचा उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची चिंता शेतकरी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे.

### शेतकऱ्यांना भरपाईची प्रतीक्षा

जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू झालेला पाऊस जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत राहिला. त्याचा परिणाम भात पेरणीवर झाला. भात पिकांसह नाचणी व इतर पिकांचेही नुकसान झाले. एक हजार २१९ गावांमधील २४ हजार ९४७ शेतकऱ्यांना फटका बसला. तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांनी संयुक्त पंचनामे केले. त्यामध्ये दहा हजार ५२४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, भरपाई म्हणून नऊ कोटी २७ लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. जिल्हा प्रशासनाकडून नुकसानीचा अहवाल शासनाला पाठविण्यात आला आहे. त्यामुळे आता नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाईची प्रतीक्षा लागून राहिली आहे.

> पाऊस यंदा उशिरा पडला. मात्र, तो पाऊस जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत राहिल्याने त्याचा परिणाम भात पेरणीवर झाला. दहा हजारहून अधिक हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, २४ हजार शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे करून शासनाला अहवाल पाठविला आहे. शासनाकडून नऊ कोटी २७ लाख रुपयांचा निधी येणे अपेक्षित आहे. डोंगर भागातील वरकस भागात पाण्याचा तुटवडा आहे. त्यामुळे पिके पिवळी पडू लागली आहेत. आठवड्यात पाऊस पडल्यास पिके चांगली राहतील. अन्यथा पावसाचा खंड पडल्यास भातासह इतर पिकांच्या उत्पादनात २० ते ३० टक्के घट होण्याची शक्यता आहे.
>
> – प्रवीण थिगळे, उपसंचालक, कृषी विभाग

### भातरोपे करपली

यंदा जिल्ह्यात ६१ हजार १०१ हेक्टरवर भात लागवड झाली असून, गतवर्षीच्या तुलनेत लागवड क्षेत्रात १२ हजार ८९९ हेक्टरने घट झाली आहे. सुरुवातीच्या पावसाने १० हजार ५२४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, २४ हजार ९४७ शेतकऱ्यांना फटका बसला. आता पावसाने दडी मारल्याने भातरोपे पिवळी पडत असून, काही ठिकाणी जमिनीला भेगा पडल्या आहेत. पावसाचा खंड कायम राहिल्यास भात उत्पादनात घटण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

## विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला

# शेकापचा पाठिंबा

### राज्यातील असंख्य कार्यकर्त्यांना सामील होण्याचे आवाहन

। रायगड। जिल्हा प्रतिनिधी ।

मुंबईतील आंदोलनानंतर शेतकरी कामगार पक्षाने एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे. बुधवारी (दि.७) पुणे येथे होणाऱ्या आंदोलनात शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील सहभागी होणार आहेत. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना पाठिंबा देण्यासाठी रायगड जिल्ह्यासह राज्यातील विद्यार्थी, तरुण आणि कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन चित्रलेखा पाटील यांनी केले.

विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) मतदार यांद्यामधील घोळ आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभाराविरोधात मुंबईमध्ये ठाकरे बंधूंनी रविवारी गर्जना मोर्चा आयोजित केला होता. महाविकास आघाडीतील घटक पक्ष या मोर्चात सहभागी झाले होते. दरम्यान, मोर्चाला पाठिंबा देण्यासाठी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या मोर्चानंतर पान २ वर

### रोहित पवारांचा सरकारला ४८ तासांचा अल्टिमेटम

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि पारदर्शकतेच्या मुद्द्यावर विद्यार्थ्यांचे आंदोलन सोमवारी पाचव्या दिवशीही सुरु राहिले. या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी पाठिंबा देत राज्य सरकारला ४८ तासांचा अल्टिमेटम दिला आहे. एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना तातडीने पदावरून हटविण्याची मागणी त्यांनी केली. सरकारने दोन दिवसांत मागण्यांवर ठोस निर्णय न घेतल्यास एक लाखांहून अधिक विद्यार्थी पुण्याच्या रस्त्यावर उतरतील, असा इशारा पवार यांनी दिला. त्यानंतर पुणे बंद किंवा पुण्याहून थेट मुंबईतील मंत्रालयावर मोठा मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून पवार विद्यार्थ्यांसोबत उपस्थित आहेत. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी ७ किंवा ८ ऑक्टोबर रोजी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांची भेट घेण्याची शक्यता असल्याचेही पवार यांनी सांगितले.

### आदिवासी विद्यार्थ्यांचा मुंबईकडे पायी मोर्चा

। नाशिक । प्रतिनिधी ।

विविध मागण्यांसाठी गेल्या ४२ दिवसांपासून आंदोलन करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांनी नाशिकहून मुंबईच्या आझाद मैदानाकडे पायी मोर्चा सुरू केला. मात्र, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, या कारणास्तव पोलिसांनी काही प्रमुख विद्यार्थ्यांना मार्गात ताब्यात घेत प्रतिबंधात्मक कारवाई केली.

आदिवासी शाळा व वसतिगृहांमध्ये सुधारित सुविधा उपलब्ध करून देणे, प्रलंबित नोकरभरती पूर्ण करणे तसेच बनावट जात प्रमाणपत्रांच्या आधारे सरकारी नोकऱ्या मिळविणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, या विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या आहेत. पान २ वर

### निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाचा दणका

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

एसआयआर प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या सुधारित ‘फॉर्म ६’ला सर्वोच्च न्यायालयाची मंजुरी असल्याचा निवडणूक आयोगाचा दावा सोमवारी मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी ठणकावून फ ेटाळून लावला. “कोणत्याही सुधारित फॉर्म ६ ला आम्ही मंजुरी दिलेली नाही,” असे स्पष्ट करत न्यायालयाने हा फॉर्म नेमका कोणी बदलला, याचा खुलासा करण्याचे संकेत दिले.

निवडणूक आयोगाने बिहारमधील एसआयआर प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा आधार घेत नव्या घोषणापत्राला मान्यता असल्याचा दावा केला होता. मात्र, न्यायालयाने या दाव्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. बिहारच्या निकालानंतरच नव्या घोषणापत्रात बदल करण्यात आल्याने त्या बदलाची न्यायालयाने तपासणीच केलेली नव्हती. सुधारित फॉर्ममध्ये नव्या मतदाराला स्वतःचे किंवा पालकांचे नाव मागील एसआयआरमध्ये नोंदले होते की नाही, याची माहिती देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या बदलाला निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनीही आक्षेप घेतला होता.

दरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कर्तव्यात कसूर केल्याचा आरोप करत दाखल याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नोटीस बजावली आहे.

## दिव्यांग शेतकरी अजूनही उपेक्षितच

### उपोषणाला आठ दिवस उलटूनही प्रशासनाकडून ठोस कार्यवाही नाही





। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

लाडीवली येथील जागेतून लोना कंपनीने सांडपाण्याची वाहिनी टाकल्याचा आरोप करीत दिव्यांग शेतकरी गणेश म्हामणकर यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. गेल्या आठ दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर त्यांचे उपोषण सुरू असूनही प्रशासनाकडून अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही. दरम्यान, उपोषणामुळे म्हामणकर यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली आहे. न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

निवेदनातून मिळालेल्या माहितीनुसार, गणेश म्हामणकर हे दृष्टीहीन दिव्यांग शेतकरी आहेत. लाडीवली येथील त्यांच्या स. नं. ३४/८ अ पान २ वर

> उपोषणाला बसलेल्या शेतकऱ्याची बैठक लावली होती. चौकशी करून अहवाल दिला जाईल, अशी त्यांना ग्वाही दिली आहे. साधारणपणे ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे तूर्तास उपोषण मागे घेण्याची विनंती त्यांना केली आहे.
>
> – संदेश शिर्के, निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड

> उपोषणाला बसलेले गणेश म्हामणकर यांची प्रकृती खालावली आहे. त्यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्याची विनंती केली आहे. मात्र, ते उपचारासाठी दाखल होण्यास तयार नाहीत. त्यांची वेळोवेळी तपासणी केली जात आहे.
>
> – डॉ. शीतल जोशी, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड

### सावळेत महिलेला कोयत्याने मारहाण

। रसायनी । प्रतिनिधी ।

रसायनी तील सावळे येथे महिलेला कोयत्याने मारहाण करून दुखापत केल्याची घटना घडली. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रात्री ११ वाजल्यापासून दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ११ वाजेपर्यंतच्या कालावधीत आरोपीने महिला फिर्यादीच्या घरी जाऊन, ‘तुला मला ठेवायचे नाही’ असे रागाच्या भरात बोलून शिवीगाळ केली. त्यानंतर आणलेल्या कोयत्याने फिर्यादीच्या डोक्यात वार करून तिला दुखापत केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.दरम्यान, भांडण सोडविण्यासाठी फिर्यादीची आई पुढे पान २ वर

## खासदारांमुळे १४ तालुके वंचित!

### राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा आरोप

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

राज्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला. रायगड जिल्ह्यामध्ये केवळ खासदार तटकरे यांचा लाडका श्रीवर्धन हा एकच तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आला आहे. बाकीच्या १४ तालुक्यांना वंचित ठेवण्याचे काम खासदार सुनील तटकरे यांनी केले आहे, असा आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटातील जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केला आहे. उरलेले चौदा तालुकेही दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात यावेत, तसेच जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी व नागरिकांना सवलती आणि मदत तातडीने मिळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कार्यवाही करावी,



अशी मागणी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे सोमवारी (दि.५) निवेदनाद्वारे करण्यात आली.

रायगड जिल्ह्यामध्ये मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून पेरणीला सुरुवात झाली. मात्र, जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस पडला नाही. पावसाने दडी मारली. जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाऊस सुरु झाला. या पावसामुळे दुबार पेरणीचे संकट जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर आले. भातपीक बहरले आहे. मात्र, पाऊस नसल्याने भाताची रोपे पिवळी पडू लागली आहेत. अशा परिस्थितीत केवळ एकाच तालुक्यात दुष्काळ जाहीर करणे आणि बाकीच्या पान २ वर

### चार वर्षांनंतरही दुरुस्तीचा प्रस्ताव लालफितीतच | अलिबाग तहसीलदारांच्या कारभाराबाबत नाराजी

## आडनावाच्या दुरुस्तीसाठी वयोवृद्ध शेतकऱ्याची वणवण

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

महसूल विभागाकडूनच पाटील आडनावाच्या जागी म्हात्रे अशी चुकीची नोंद होऊन पंधरा वर्षे उलटली. ही नोंद दुरुस्त करण्यासाठी वयोवृद्ध शेतकरी गेल्या चार वर्षांपासून अलिबाग तहसील कार्यालयाच्या फेऱ्या मारत आहेत. मात्र, अद्याप त्यांच्या अर्जाची दखल घेतली नसल्याचा आरोप आहे. दुरुस्तीचा प्रस्ताव लालफितीत अडकल्याने वयोवृद्ध शेतकऱ्याला महसूल विभागाच्या कारभाराचा फटका सहन करावा लागत आहे. त्यामुळे अलिबाग तहसीलदारांच्या कारभाराबाबत शेतकऱ्यांकडून नाराजीचे सूर उमटत आहेत.

पांडुरंग रामभाऊ पाटील (७४) असे या वयोवृद्ध शेतकऱ्याचे नाव असून, ते अलिबाग तालुक्यातील सुडकोली येथील रहिवासी आहेत. सुडकोली परिसरात त्यांची वडिलोपार्जित जमीन आहे. त्यांच्या वडिलांच्या इतर मिळकतीवर रामभाऊ कमळू पाटील अशी नोंद आहे. मात्र, गट नं. ८४६ आणि ६७८ या मिळकतीवर गट स्कीम योजना अर्थात एकत्रीकरणानंतर चुकीने रामभाऊ कमळू म्हात्रे असे आडनाव नमूद करण्यात आले आहे. गेल्या पंधरा वर्षांपूर्वी महसूल विभागाकडूनच ही चुकीची नोंद झाल्याचा आरोप पांडुरंग पाटील यांनी केला आहे. या नोंदीची दुरुस्ती करण्यासाठी त्यांनी १९ सप्टेंबर २०२२ रोजी अलिबाग तहसीलदार कार्यालयात कागदपत्रांसह अर्ज केला.



> गट स्कीम योजनेनंतर अर्थात एकत्रीकरणानंतर नजरचुकीने रामभाऊ कमळू म्हात्रे अशी सातबाऱ्यावर नोंद झाली आहे. रामभाऊ कमळू पाटील ही दुरुस्ती करण्यासाठी अलिबाग तहसील कार्यालयात कागदपत्रांसह अर्ज केला आहे. गेल्या चार वर्षांपासून तहसील कार्यालयात चपला झिजवत आहे. परंतु, अजूनपर्यंत कोणतीही दखल घेतली नाही.
>
> – पांडुरंग रामभाऊ पाटील, शेतकरी

> संबंधित शेतकऱ्यांचा फेरफार बघून तातडीने कार्यवाही केली जाईल.
>
> – विक्रम पाटील, तहसीलदार, अलिबाग

प्रशासनाकडून झालेल्या चुकीच्या नोंदीचा फटका या शेतकऱ्याला बसत असून, गेल्या चार वर्षांपासून ते दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहेत.

दुरुस्तीसाठी गेल्या चार वर्षांपासून तहसील कार्यालयाच्या फेऱ्या मारूनही अद्याप न्याय मिळाला नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या चुकीचा त्रास वयोवृद्ध शेतकऱ्याला अनेक वर्षांपासून सहन करावा लागत आहे. मात्र, या प्रकरणाची तहसीलदारांकडून दखल घेतली जात नसल्याने महसूल विभागाच्या कारभाराबाबत शेतकऱ्यांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

## जेवणातील लिंबाची चव महागली

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

जेवणाची चव वाढविणाऱ्या लिंबावर महागाईची संक्रांत आली असून, कमी आवकेमुळे लिंबाचे दर चांगलेच कडाडले आहेत. पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीत स्थानिक आवक घटल्याने आंध्र प्रदेश आणि सोलापूरहून लिंबू मागवावा लागत आहे. त्यामुळे घाऊक पान २ वर

### एक लिंबू १२ ते १५ रुपयांना!

लिंबाची आवक घटल्याने किरकोळ बाजारात दर कडाडले आहेत. चांगल्या प्रतीचे एक लिंबू सध्या १२ ते १५ रुपयांना विकले जात आहे. त्यामुळे नेहमीच्या जेवणात सहज वापरला जाणारा लिंबू आता ग्राहकांच्या खिशाला चांगलीच झळ देत आहे.



# बल्क ड्रग पार्कवरुन रायगडात संघर्षाची ठिणगी

■ **शेतकऱ्यांचा विरोध डावलून सरकारचा प्रकल्प पुढे नेण्याचा प्रयत्न**

■ **आंदोलकांवर गुन्हे, जमीन-पर्यावरणाच्या प्रश्नांवरून संघर्ष तीव्र**

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असतानाही बल्क ड्रग पार्कचा प्रकल्प पुढे रेटण्याचा सरकारचा प्रयत्न सुरूच असून, प्रकल्पाच्या बांधकामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. जमीन, पर्यावरण आणि स्थानिकांच्या हक्कांबाबत शेतकऱ्यांकडून गंभीर प्रश्न उपस्थित केले जात असतानाच आंदोलकांवर गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामुळे एकीकडे शासन प्रकल्प उभारण्यासाठी आक्रमक झाले असताना दुसरीकडे स्थानिक शेतकरीही आपली जमीन वाचविण्यासाठी संघर्षाच्या पवित्र्यात असल्याचे चित्र आहे. प्रकल्पाच्या बांधकामाला सुरुवात झाली असली तरी विरोधाची धग कायम असल्याने बल्क ड्रग पार्कवरून रायगडमध्ये पुन्हा संघर्ष पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बल्क ड्रग पार्क सुरुवातीला रोहा-मुरुड परिसरात प्रस्तावित होता. मात्र, तेथील विरोधानंतर प्रकल्पासाठी माणगाव तालुक्यातील आठ आणि रोहा तालुक्यातील तीन गावांचा समावेश करण्यात आला. त्यानंतर जमीन संपादनावरून स्थानिकांमध्ये असंतोष निर्माण झाला. शिवसेनेचे जनार्दन मानकर यांनी जमीन संपादनाच्या प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या दाव्यानुसार, विशिष्ट नेत्यांच्या जमिनी वगळून गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी ताब्यात घेण्यात आल्या. शासनाने सुमारे १४ लाख ६० हजार रुपये प्रति एकर दराने जमीन घेतली असून, पुढे ती उद्योगांना सुमारे दोन कोटी रुपये प्रति एकर दराने दिली जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नसून, जमीन संपादनाची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे जाहीर करण्याची मागणी आंदोलकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, आंदोलनाशी संबंधित काही व्यक्तींवर कोलाड पोलीस ठाण्यात खंडणीसह इतर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. बाबू खानविलकर, आकाश कोदे, विष्णू कोदे यांच्यासह अन्य व्यक्तींवर गुन्हे दाखल झाल्याने प्रकल्पविरोधातील आंदोलनाला आता कायदेशीर संघर्षाचीही किनार मिळाली आहे. मात्र, आपला विरोध स्थानिक शेतकरी, जमीन आणि पर्यावरणाच्या प्रश्नांसाठी असल्याचे आंदोलकांकडून सांगण्यात येत आहे.

प्रकल्पासाठी आवश्यक विविध परवानग्या मिळाल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, ही आश्वासने लेखी स्वरूपात आंदोलकांच्या हातात का देण्यात आली नाहीत, असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. केवळ तोंडी आश्वासनांपेक्षा शासनाने पर्यावरणीय उपाययोजना, स्थानिकांना मिळणारे लाभ, रोजगार आणि पुनर्वसनासंबंधी बाबी लेखी स्वरूपात स्पष्ट कराव्यात, अशी मागणी होत आहे.

माणगाव तालुक्यातील विळे-भागाड औद्योगिक वसाहतीलाही यापूर्वी स्थानिक नेते आणि नागरिकांनी तीव्र विरोध केला होता. विविध आंदोलनेही झाली. मात्र, कालांतराने या परिसरात सुमारे ३० कारखाने सुरू झाले आहेत. त्यामुळे बल्क ड्रग पार्कच्या पार्श्वभूमीवर विळे-भागाडचा अनुभवही स्थानिकांच्या चर्चेचा विषय ठरत आहे. बल्क ड्रग पार्कमुळे हजारो रोजगार निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, औद्योगिक विकासामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते, अशी शासनाची भूमिका आहे. मात्र, जमीन गेल्यानंतर शेतकऱ्यांच्या भविष्यातील उपजीविकेचे काय, पर्यावरण सुरक्षित राहील का, पाणी आणि हवेवर परिणाम होणार नाही याची हमी कोण देणार आणि स्थानिकांना रोजगारात प्राधान्य मिळणार का, असे प्रश्न शेतकरी आणि आंदोलकांकडून उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे बल्क ड्रग पार्क हा केवळ औद्योगिक प्रकल्प न राहता विकास आणि स्थानिकांच्या हक्कांमधील संघर्षाचा मुद्दा बनला आहे. बांधकाम सुरू झाले असले तरी शेतकऱ्यांचा विरोध कायम असून, सरकार हा विरोध डावलून प्रकल्प किती पुढे नेणार आणि आंदोलकांशी संवादातून तोडगा काढणार का, याकडे रायगडचे लक्ष लागले आहे.

# उरणकरांच्या जीवाशी खेळ

■ **डेंग्यू-मलेरियाचा धोका वाढला, फॉगिंग गायब!**




**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहर आणि तालुक्यात डासांचा अक्षरशः सुळसुळाट झाला असून डेंग्यू, मलेरिया आणि इतर आजारांची भीती नागरिकांच्या मनात घर करू लागली आहे. मात्र डासांचा बंदोबस्त करण्यासाठी आवश्यक असलेली फॉगिंग आणि केमिकल स्प्रेची फवारणीच होत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. डास चावतात, नागरिक आजारी पडतात; पण प्रशासनाच्या आरोग्य यंत्रणेला त्याचे काहीच सोयरसुतक नाही का? असा संतप्त सवाल आता उरणकर विचारत आहेत.

पावसाळ्यानंतर ठिकठिकाणी साचलेले पाणी, तुंबलेली गटारे, नाले, कचऱ्याचे ढीग आणि अस्वच्छ परिसरामुळे डासांची उत्पत्ती वाढण्याची शक्यता असतानाही प्रतिबंधात्मक उपाययोजनांना म्हणावी तशी गती नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. डासांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असताना फॉगिंग मशीन नेमकी कुठे फिरते आणि केमिकल स्प्रेची फवारणी कुठे होते, याचा हिशोब प्रशासनाने जनतेसमोर ठेवावा, अशी मागणी होत आहे.

आजार पसरल्यानंतर रुग्णालयांच्या फेऱ्या वाढविण्यापेक्षा डासांची पैदास होण्याआधीच त्यांचा बंदोबस्त करणे हे प्रशासनाचे काम नाही का? असा सवाल उपस्थित होत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न असतानाही केवळ कागदोपत्री उपाययोजना करून भागणार नाही. संवेदनशील परिसरांची पाहणी, साचलेल्या पाण्याचा निचरा, गटारे-नाले स्वच्छता आणि नियमित फॉगिंग-केमिकल स्प्रेची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

उरण शहरासह ग्रामीण भागातही डासांचा प्रादुर्भाव वाढत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे आरोग्य विभागाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने प्रतिबंधात्मक मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. डेंग्यू-मलेरिया पसरल्यानंतर प्रशासन जागे झाले तर तोपर्यंत वेळ निघून गेलेली असेल.

उरणकरांच्या आरोग्याचा प्रश्न हा प्रयोग करण्याचा विषय नाही. फवारणीच्या नावावर केवळ धूर नको; डासांच्या उत्पत्तीवर थेट घाव हवा! प्रशासनाने तातडीने शहर आणि तालुक्यात व्यापक फॉगिंग व केमिकल स्प्रे मोहीम राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा वाढत्या डासांच्या साम्राज्याला जबाबदार कोण, हा सवाल अधिक तीव्र होणार आहे.

## हल्ला करून पळून जाणाऱ्या आरोपीला केली अटक

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

ऑक्टोबर २०२५ मध्ये २१ वर्षीय तरुणाचा हत्येचा प्रयत्न करून पळून गेलेल्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी ४ ऑक्टोबर २०२६ रोजी अटक केली. राहुल राजेश साळुंखे (रा. शिवाजीनगर झोपडपट्टी पनवेल) असे आरोपीचे नाव आहे.

ऑक्टोबर २०२५ मध्ये शकील मोहम्मद अयुब शेख (राहणार नवनाथ नगर झोपडपट्टी पनवेल) याच्यावर सात ते आठ जणांनी दांडके, चॉपरने वार करून आरोपी पळून गेले होते. त्यानंतर पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले होते. त्यानंतर तब्बल वर्षभरानंतर राहुल राजेश साळुंखे याची गुप्त बातमी दाराकडून पनवेल शहर पोलिसांना माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनंत परागे आणि त्यांच्या पथकाने आरोपीला पनवेल येथून ताब्यात घेतले आणि अटक केली. यातील आणखी आरोपींचा शोध पोलिसांकडून सुरू आहे.

पान १ वरुन

## १६ ऑक्टोबरपासून राज्यात पाणीकपात

गिरीश महाजन यांनी दिली. सन २०१६ च्या खरीप हंगामातील ट्रिगर-१ लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. पुढील वर्षापर्यंत अलनिनोचा प्रभाव राहण्याची शक्यता लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने सर्व संबंधित यंत्रणांना पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करण्याचे आणि कठोर उपाययोजना राबवण्याचे स्पष्ट आदेश दिल्याचे महाजन यांनी सांगितले.

धरणे व जलाशयांमधील पाण्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य दिले जाईल. बाष्पीभवन, गाळ व अनधिकृत उपसा विचारात घेऊन ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याचे पाणी आरक्षित ठेवले जाईल. याशिवाय, भविष्यातील अनिश्चितता लक्षात घेऊन प्रत्येक धरणात १०% अतिरिक्त आपत्कालीन बफर साठा राखीव ठेवला जाईल.

पिण्याचे पाणी, जनावरे आणि चाऱ्याची गरज भागल्यानंतरच उर्वरित पाण्याचे सिंचनासाठी वाटप होईल. प्रथम रब्बी हंगामातील भुसार व चारा पिकांना, त्यानंतर इतर रब्बी पिकांना आणि पाणो शिल्लक राहिल्यासच बारमाही पिकांना मंजुरी दिली जाईल. पाणी बचत करणाऱ्या सिंचन पद्धतींवर भर दिला जाईल. औद्योगिक क्षेत्रातील वापरासाठी किमान ३०% पाण्याचा पुनर्वापर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

## टँकरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, नागरिकांनी त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. दारूच्या नशेत रस्ता चुकल्याने चालक बारसोलीकडे गेला होता, अशी माहिती नागरिकांनी दिली. याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून पुढील तपास पोलीस हवालदार आशुतोष म्हात्रे करीत आहेत.

दरम्यान, नशेत अवजड वाहन चालविणे म्हणजे इतरांच्या जीवाशी खेळण्यासारखे आहे. अशा चालकांवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे, अशी मागणी धाटाव येथील सामाजिक कार्यकर्ते रोहिदास पाशिलकर यांनी केली आहे.

## दिव्यांग शेतकरी अजूनही उपेक्षितच

या जागेतून लोना इंडस्ट्रीज प्रा. लिमिटेड या कंपनीने सांडपाणी वाहून नेण्यासाठी वाहिनी टाकली आहे. मात्र, शेतकऱ्यांना विश्वासात न घेता ही वाहिनी टाकण्यात आल्याचा आरोप म्हामणकर यांनी केला आहे.

याप्रकरणी न्याय मिळविण्यासाठी गणेश म्हामणकर यांनी अखेर जिल्हा प्रशासनाकडे धाव घेतली आहे. अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवार (दि. २८) पासून त्यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. आठ दिवस उलटूनही जिल्हा प्रशासनाकडून ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. न्याय मिळेपर्यंत आपला लढा सुरूच ठेवण्याचा निर्धार म्हामणकर यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावली आहे.

## सावळेत महिलेला कोयत्याने मारहाण

गेली असता झटापटीमध्ये कोयत्याचे टोक त्यांच्या खांद्याला व डाव्या हाताला लागून दुखापत झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

यानंतर आरोपीने फिर्यादीचा हात जबरदस्तीने पकडून तिला देवळोली येथील क्रिकेट मैदानावर नेले. तेथे पुन्हा हाताबुक्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पाटील करीत आहेत.

## ब्रेक निकामी ट्रकची धडक

ट्रकचे ब्रेक अचानक निकामी झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटले. त्याने टीएन ३४ एझेड ९११४ क्रमांकाच्या ट्रकला धडक दिली. धडकेनंतर चालक व मदतनीस केबिनमध्ये अडकले होते. बचाव पथकाने दोघांना बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. अपघातग्रस्त वाहने बाजूला केल्याने द्रुतगती मार्गावरील वाहतूक सुरळीत राहिली.

## अंबा नदी पुलावर टँकरचा अपघात

आरोप आहे. स्थानिक नागरिकांकडून माहिती मिळाल्यानंतर नागोठणे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिस हवालदार प्रशांत भोईर व वाहतूक शाखेचे पोलिस नाईक राजू पाटील यांच्या उपस्थितीत क्रेनच्या सहाय्याने टँकर बाजूला करण्यात आला. यावेळी काही काळ वाहतूक कोंडी झाली.

रिलायन्सच्या विस्तारित प्रकल्पामुळे या मार्गावर अवजड वाहनांची वर्दळ वाढली असून, अपघाताची माहिती पोलिसांना न देण्याच्या प्रकारामुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे. पुलाच्या नुकसानग्रस्त कठड्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे. रिलायन्सचे जनसंपर्क अधिकारी रमेश धनवडे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नाही.

## शेकापचा पाठिंबा

शेतकरी कामगार पक्षाचे लाल वादळ पुण्यामध्ये विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कासाठी धडकणार आहेत. पुणे येथील एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी महाराष्ट्रातील शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते पुण्यात बुधवारी (दि.७), दुपारी दोन वाजता दाखल होणार आहेत. चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आ. रोहित पवार यांच्या विनंतीला मान देऊन असंख्य कार्यकर्ते या ठिकाणी जमणार आहेत. रायगडसह महाराष्ट्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी व तरुणांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना पाठिंबा देण्यासाठी आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले.

## जेवणातील लिंबाची चव महागली

बाजारातील दरवाढीचा थेट फटका किरकोळ बाजारातील ग्राहकांना बसत असून, चांगल्या प्रतीचे एक लिंबू तब्बल १२ ते १५ रुपयांना विकले जात आहे. गेल्या दीड महिन्यात झालेल्या पावसाचा लिंबाच्या पिकावर परिणाम झाला आहे. लिंबाच्या झाडांना मोठ्या प्रमाणात फुलोरा आला; मात्र अपेक्षित फळधारणा झाली नाही. त्यामुळे बाजारातील आवक कमी होऊन लिंबाचा तुटवडा निर्माण झाला आहे.

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या आंध्र प्रदेश तसेच सोलापूर भागातून लिंबाची आवक होत आहे. स्थानिक भागातून आवक कमी असल्याने बाहेरील बाजारपेठांवर अवलंबून राहावे लागत आहे. आवक आणि मालाच्या गुणवत्तेनुसार घाऊक दरात चढ-उतार होत असले तरी चांगल्या प्रतीच्या लिंबाला मागणी कायम आहे.घाऊक बाजारातून किरकोळ बाजारात लिंबू पोहोचेपर्यंत वाहतूक, हमाली आणि इतर खर्चाची भर पडते. त्यामुळे ग्राहकांना लिंबासाठी अधिक पैसे मोजावे लागत आहेत. दररोजच्या जेवणासोबतच कोशिंबीर, भेळ, मिसळ, वडापाव तसेच विविध पदार्थांमध्ये लिंबाचा वापर होत असल्याने वाढलेल्या दराचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघराच्या बजेटवर झाला आहे. पावसामुळे फुलोरा चांगला आला असला तरी फळधारणा कमी झाल्याने निर्माण झालेली टंचाई आणखी काही काळ राहण्याची शक्यता व्यापारी व्यक्त करीत आहेत. आवक वाढली नाही तर लिंबाचे दर आणखी वाढण्याची भीतीही व्यक्त होत आहे. त्यामुळे 'अपचनावर लिंबू पचन करून देणार की नाही?' असा मिश्कील सवाल ग्राहकांकडून केला जात असला, तरी वाढलेल्या दरामुळे स्वयंपाकघरातील लिंबाची चव मात्र चांगलीच महागली आहे.

**पावसामुळे लिंबाच्या झाडांना फुलोरा चांगला आला; मात्र फळधारणा कमी झाली आहे. त्यामुळे बाजारात आवक घटली आहे. सध्या आंध्र प्रदेश आणि सोलापूरहून लिंबाची आवक होत आहे. आवक वाढली नाही तर लिंबाचे दर आणखी वाढण्याची शक्यता आहे.**

**- संतोष शेंडे, लिंबू व्यापारी**

## आदिवासी विद्यार्थ्यांचा मुंबईकडे पायी मोर्चा

मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी मुंबईकडे पायी मोर्चा काढला. दरम्यान, कोणत्याही विद्यार्थ्याला बेकायदेशीरपणे अटक करण्यात आलेली नसून, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया व प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. या कारवाईचा काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात आणि विजय वडेट्टीवार यांनी निषेध केला आहे.

## खासदारांमुळे १४ तालुके वंचित!

तालुक्यांना वंचित ठेवणे, हे उचित नाही. याबाबत पक्षाची आढावा बैठक रोहामध्ये घेण्यात आली. यानंतर शिष्टमंडळाने सोमवारी (दि.५) जिल्हाधिकारी जावळे यांची भेट घेतली. शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये व शेतमजुरांना २५ हजार रुपये अशी भरपाई मिळाली पाहिजे, या प्रमुख मागणीसह दुधाला वाढीव बाजारभाव मिळावा, अशा अनेक मागण्यांसाठी निवेदन देण्यात आले आहे. या मागण्यांची दखल प्रशासनाने तातडीने घ्यावी अन्यथा तीव्र आंदोलन पुकारले जाईल, असा इशारा चव्हाण यांनी दिला.

जिल्ह्यातील दुष्काळाची प्रत्यक्ष परिस्थिती, पाणीटंचाई, पिकांचे नुकसान, जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता, रोजगाराचा प्रश्न आणि शेतकऱ्यांवरील आर्थिक संकट याचा प्रशासनाने तातडीने आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दूध खरेदीच्या दरामध्ये योग्य प्रमाणात वाढ करण्यात यावी, दूध उत्पादक शेतकऱ्यांना शासनाच्या माध्यमातून आवश्यक आर्थिक व इतर सहाय्य उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.



## अतिक्रमणांवर महापालिकेचा हातोडा

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

कळंबोली वसाहतीतील अतिक्रमणांविरोधात पनवेल महानगरपालिकेने धडक मोहीम राबवली. प्रभाग समिती 'अ' अंतर्गत डी मार्ट परिसर, सेक्टर १७, सेक्टर २० आणि मार्बल मार्केट येथे केलेल्या कारवाईत अनधिकृत बांधकामे हटविण्यासह परवानगीविना सुरू असलेल्या नर्सऱ्यांवरही जेसीबीच्या सहाय्याने कारवाई करण्यात आली.

महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशाने आणि उपायुक्त रविकिरण घोडके यांच्या निर्देशानुसार प्रभाग अधीक्षक अरविंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली. सार्वजनिक जागांचा अनधिकृत वापर करून उभारण्यात आलेल्या संरचना तसेच व्यवसायासाठी करण्यात आलेली अतिक्रमणे कारवाईदरम्यान हटविण्यात आली. मार्बल मार्केट परिसरातील बेकायदेशीर नर्सऱ्यांच्या संरचना व साहित्य जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आले.

कळंबोली परिसरातील अतिक्रमणांमुळे वाहतूक आणि नागरिकांच्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने ही कारवाई केली. सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणांविरोधात यापुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले.

## पाण्यासाठी आक्रोश



■ **नागरिक त्रस्त, हंडा मोर्चाचा इशारा**

**। खांदेश्वर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात येणाऱ्या शटडाऊनमुळे खांदा वसाहतीतील नागरिकांना पाण्यासाठी अक्षरशः वणवण करावी लागत आहे. त्यातच सिडकोकडून कमी दाबाने आणि कमी वेळ पाणीपुरवठा होत असल्याने आधीच पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या नागरिकांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

खांदा वसाहतीतील अनेक सोसायट्यांमध्ये पुरेशा दाबाने पाणी येत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. काही ठिकाणी पाणी येण्याचा कालावधीही कमी झाल्याने दैनंदिन गरजा भागविण्यासाठी नागरिकांना पाण्याची साठवणूक करावी लागत आहे.

या प्रश्नावर खांदा वसाहतीतील नागरिक, सोसायटी पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी नवीन पनवेल येथील सिडको कार्यालय गाठून पाणीपुरवठा अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी नगरसेवक एकनाथ गायकवाड, नगरसेवक दशरथ म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, सचिन गायकवाड, भीमराव पवार, जयंत भगत यांच्यासह महिला वर्ग आणि विविध सोसायट्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. याबाबत सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. पाणीपुरवठ्यातील कमी दाब, कमी वेळ आणि वारंवार होणारे शटडाऊन यावर तातडीने तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली.

दरम्यान, खांदा वसाहतीतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. आता सिडको प्रशासन या मागण्यांवर काय कार्यवाही करते, याकडे खांदा वसाहतीतील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## खांदा कॉलनी येथील ४३ वर्षीय इसमाचा अपघातात मृत्यू

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

खांदा कॉलनी येथील रस्त्यावर अ‍ॅक्टिवा गाडी डिव्हायडरला धडकल्याने झालेल्या अपघातात ४३ वर्षीय महानतेष देवेंद्रप्पा बिदनुरकर (राहणार सेक्टर ४ आसुडगाव) यांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात चार ऑक्टोबर रोजी करण्यात आले.

एक ऑक्टोबर रोजी यातील महानतेष बिदनुरकर हा अ‍ॅक्टिवा गाडी क्रमांक एम एच ४६ ए एल ८४८६ ही भरधाव वेगाने घेऊन रायन स्कूल सेक्टर ११, निलसिद्धी सोसायटीचा समोर खांदा कॉलनी रस्त्यावर आला आणि डिव्हायडरला धडकून त्यात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापती झाल्या. त्याला एमजीएम हॉस्पिटल येथे दाखल केले असता तीन ऑक्टोबर रोजी सायंकाळी त्याचा मृत्यू झाला.

**जाहीर सूचना**

याद्वारे सर्व संबंधितांना जाहीर करण्यात येते की, खाली नमूद केलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मिळकतींच्या संदर्भात, खाली नमूद केलेल्या मालकांच्या मालकी हक्कांची आम्ही कायदेशीर तपासणी करीत आहोत.

सदर मालकांविरुद्ध आणि/किंवा खाली नमूद केलेल्या मिळकतीमध्ये अथवा त्यातील कोणत्याही भागामध्ये विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, परवाना, हक्क हस्तांतरण, गहाण (समन्यायी गहाणासह अथवा अन्य प्रकारे), वारसा, मृत्युपत्राद्वारे प्राप्त हक्क, उत्तराधिकार, बक्षीसपत्र, धारणाधिकार, बोजा, निर्वाहभत्ता, सुखाधिकार, न्यास, प्रत्यक्ष ताबा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा अथवा आदेश, करार/संविदा, विकास हक्क, भागीदारी अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाने कोणताही हिस्सा, हक्क, मालकी हक्क, दावा, लाभ, मागणी अथवा हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्ती/संस्था, तसेच कोणतीही बँक अथवा वित्तीय संस्था यांनी, त्यांचे सदर हक्क, दावे, मागण्या अथवा हरकती असल्यास, त्याबाबतची लेखी माहिती आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह, ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १० (दहा) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर खालील हस्ताक्षरी करणार यांच्याकडे सादर करावी.

विहित मुदतीत अशा प्रकारची लेखी माहिती व कागदोपत्री पुरावे सादर न केल्यास, संबंधितांचे असे सर्व दावे, मागण्या व हरकती असल्यास, ते त्यांनी स्वेच्छेने सोडून दिलेले अथवा त्यागलेले आहेत, असे समजण्यात येईल.

**अनुसूची**

महाराष्ट्र राज्य, जिल्हा रायगड, तालुका पनवेल, मौजे खानावळे येथील जमीन मिळकत, जिचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

| सर्वे क्रमांक | हिस्सा क्रमांक | ७/१२ उताऱ्याप्रमाणे क्षेत्र (हे. आर. चौ. मीटर) | नाव |
|---|---|---|---|
| ६१ | ३ | ०-५४-९० | १.अशोक राम ठाकूर<br>२.रविंद्र राम ठाकूर |

दिनांक : ०६ ऑक्टोबर २०२६

सही/-
वकील सचिनकुमार पी. राजेपांढरे
कार्यालय क्र. १०१, भूमी मॉल,
प्लॉट क्र. ०९, सेक्टर १५,
सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई - ४१०२०६.

**जाहीर सूचना**

याद्वारे सर्व संबंधितांना जाहीर करण्यात येते की, खाली नमूद केलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मिळकतींच्या संदर्भात, खाली नमूद केलेल्या मालकांच्या मालकी हक्कांची आम्ही कायदेशीर तपासणी करीत आहोत.

सदर मालकांविरुद्ध आणि/किंवा खाली नमूद केलेल्या मिळकतीमध्ये अथवा त्यातील कोणत्याही भागामध्ये विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, परवाना, हक्क हस्तांतरण, गहाण (समन्यायी गहाणासह अथवा अन्य प्रकारे), वारसा, मृत्युपत्राद्वारे प्राप्त हक्क, उत्तराधिकार, बक्षीसपत्र, धारणाधिकार, बोजा, निर्वाहभत्ता, सुखाधिकार, न्यास, प्रत्यक्ष ताबा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा अथवा आदेश, करार/संविदा, विकास हक्क, भागीदारी अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाने कोणताही हिस्सा, हक्क, मालकी हक्क, दावा, लाभ, मागणी अथवा हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्ती/संस्था, तसेच कोणतीही बँक अथवा वित्तीय संस्था यांनी, त्यांचे सदर हक्क, दावे, मागण्या अथवा हरकती असल्यास, त्याबाबतची लेखी माहिती आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह, ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १० (दहा) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर खालील हस्ताक्षरी करणार यांच्याकडे सादर करावी.

विहित मुदतीत अशा प्रकारची लेखी माहिती व कागदोपत्री पुरावे सादर न केल्यास, संबंधितांचे असे सर्व दावे, मागण्या व हरकती असल्यास, ते त्यांनी स्वेच्छेने सोडून दिलेले अथवा त्यागलेले आहेत, असे समजण्यात येईल.

**अनुसूची**

महाराष्ट्र राज्य, जिल्हा रायगड, तालुका पनवेल, मौजे खानावळे येथील जमीन मिळकत, जिचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

| सर्वे क्रमांक | हिस्सा क्रमांक | ७/१२ उताऱ्याप्रमाणे क्षेत्र (हे. आर. चौ. मीटर) | नाव |
|---|---|---|---|
| ६१ | २/अ | ०-३३-३० | १.जनार्दन बाबू ठाकूर<br>२.अशोक राम ठाकूर<br>३.काशिनाथ राम ठाकूर<br>४.रमेश राम ठाकूर<br>५.रविंद्र राम ठाकूर<br>६. गुलाब मारुती पाटील |

दिनांक : ०६ ऑक्टोबर २०२६

सही/-
वकील. सचिनकुमार पी. राजेपांढरे
कार्यालय क्र. १०१, भूमी मॉल,
प्लॉट क्र. ०९, सेक्टर १५,
सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई - ४१०२०६.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सूचना**

निम्नस्वाक्षरीकारांकडून पुढील कामासाठी अनुभवी व नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई-निविदा मागवण्यात येत आहेत. आर्थिक वर्ष २०२६-२७ चे टी - १६, टी -१७ व टि - १८ अनुक्रमे मुरुड, पाली व रोहा उपविभागातील २० KW पर्यंत लघुदाब घरघुती, वाणिज्य व इतर मीटर रीडिंग वाचन महावितरण मोबाईल ऐपद्वारे, बिल प्रिंटींग व वाटप करण्याच्या कामाकरीता. निविदा विक्री कालावधी दि ०६.१०.२०२६ ते १५.१०.२०२६ निविदा भरण्याची शेवटची तारीख दि. १५.१०.२०२६ रोजी २३:०० वाजेपर्यंत. वरील निविदा भरण्याकरिता कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळावर भेट द्यावी.

**PRO NO - 101** — **कार्यकारी अभियंता, रोहा विभाग**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे भालिवडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक नारायण श्रीनिवास भगवान भानुसघरे, रोहिदास भगवान भानुसघरे, इंदुबाई भगवान भानुसघरे, व सुमती संदीप भोईर यांचेकडून आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|
| ०१ | १५/२/अ/२ | ००.३२.०० | २.८७ |
| ०२ | १५/२/ब | ००.२६.०० | २.१२ |
| ०३ | १५/३ | ००.२३.०० | २.१६ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून, १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजाहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०६ ऑक्टोबर २०२६

ॲड. शरद आर. सावंत
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ.हौ.सो.लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

# निवडक



## धडक कारवाईत लाखोंचा मुद्देमाल जप्त

**पाताळगंगा :** महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित विमल पानमसाला व सुगंधी तंबाखूची वाहतूक व विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची दोघांवर कारवाई केली. या कारवाईत सुमारे १ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मनोज कुमार जगत दास (१९) व मोहम्मद बिलाल मोहम्मद कासिम (२१) अशी कारवाई करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, खालापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस हवालदार रणजितसिंह खराडे यांना प्रतिबंधित सुगंधित पानमसाला व तंबाखूबाबत गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ कारवाईचे नियोजन करून संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी दोघांकडून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित विमल पानमसाला व सुगंधी तंबाखू आढळून आली. पोलिसांनी हा सर्व मुद्देमाल जप्त करून दोघांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री व साठवणूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मोहीम पोलिसांकडून सुरू असल्याचे या कारवाईवरून स्पष्ट झाले आहे.

## उरणच्या सदनिकांवर कारवाई कधी?

**उरण :** निवासी वापरासाठी मंजूर असलेल्या जागेचा नियमबाह्य व्यावसायिक वापर करणाऱ्यांसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२२ सप्टेंबर रोजीच्या आदेशाने धोक्याची घंटा वाजली आहे. निवासी वापरासाठी निश्चित केलेल्या जागेचा परवानगीशिवाय व्यावसायिक वापर होत असल्यास संबंधित प्राधिकरणाने कायद्यानुसार कारवाई करावी, तसेच कारवाई करताना 'पिक अँड चूज' म्हणजे निवडक पद्धतीचा अवलंब करू नये, अशी भूमिका न्यायालयाने स्पष्ट केली आहे. या पार्श्वभूमीवर उरण शहरातील निवासी सदनिकांमध्ये सुरू असलेल्या कथित व्यावसायिक वापराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. उरणमध्ये काही निवासी सदनिकांचा वापर दवाखाने, पॅथॉलॉजी लॅब, दुकाने, ब्युटी पार्लर आणि अन्य व्यावसायिक कारणांसाठी खुलेआम सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. निवासी वापरासाठी मंजूर असलेल्या सदनिकांमध्ये व्यावसायिक आस्थापना सुरू करण्यासाठी आवश्यक परवानग्या घेतल्या आहेत का? संबंधित वापर मंजूर बांधकाम आराखड्याशी सुसंगत आहे का? याची तपासणी करण्याची गरज असताना पालिका प्रशासन मात्र याकडे गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप होत आहे. या कथित प्रकाराबाबत यापूर्वी वृत्त प्रसिद्ध झाले असून, पालिका प्रशासनाकडे लेखी तक्रारीही करण्यात आल्या आहेत. मात्र, त्यानंतरही संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी अथवा प्राथमिक चौकशी झालेली नसल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रशासनाच्या या भूमिकेबाबत उरणकरांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




## खांदा वसाहतीत गंभीर वाहतूक कोंडी

**खांदेश्वर :** खांदा वसाहतीतील वाढत्या वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, या कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना करणारे प्रशासन कधी सापडणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. खांदा वसाहतीत अनेक शाळा असल्याने सकाळी एकाच वेळी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, पालक आणि स्कूल बसची वर्दळ वाढते. दुपारी शाळा सुटताना पुन्हा त्याच ठिकाणी वाहतुकीचा ताण निर्माण होतो. सायंकाळी कार्यालयातून परतणाऱ्या चाकरमान्यांची वाहने याच वेळी रस्त्यावर आल्याने वाहतूक कोंडीत आणखी भर पडते. तसेच, खांदा वसाहतीतून नवीन पनवेलच्या दिशेने आणि सुखापूर, माथेरान रोडकडे जाण्यासाठी हा परिसर शॉर्टकट मार्ग म्हणून अनेक वाहनचालक वापरतात. त्यामुळे बाहेरील वाहनांचीही वर्दळ वाढली आहे. दरम्यान, परिसरात मोठ्या प्रमाणावर नवीन बांधकामे सुरू असल्याने दिवसेंदिवस लोकसंख्या आणि वाहनांची संख्या वाढत आहे. त्यातच खांदा वसाहतीमध्ये रुग्णालयांची संख्याही वाढत असल्याने रुग्णवाहिका, रुग्णांचे नातेवाईक आणि इतर वाहनांची ये-जा वाढली आहे. त्यामुळे खांदा वसाहतीची वाहतूक समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाकडून ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना कधी होणार? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

# पनवेल मनपात पदांचा सावळागोंधळ

| पनवेल | प्रतिनिधी |

**पनवेल महानगरपालिकेला दहा वर्षे पूर्ण झाली असतानाही प्रशासकीय पदांची रचना आणि जबाबदाऱ्यांच्या वाटपाबाबत प्रश्नचिन्ह कायम आहे. महापालिकेच्या काही प्रभाग कार्यालयांत पात्र अधिकारी उपलब्ध असताना लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांकडे अधीक्षकपदाची जबाबदारी सोपविल्याची चर्चा आहे. काही कर्मचाऱ्यांकडे वर्षानुवर्षे महत्त्वाची पदे कायम असल्याने नियुक्त्यांचे निकष आणि प्रशासकीय पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.**

महापालिकेच्या चार प्रभाग कार्यालये आणि एका उपप्रभाग कार्यालयापैकी कामोठे वगळता अन्य कार्यालयांत लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांकडे महत्त्वाच्या प्रशासकीय जबाबदाऱ्या असल्याचे सांगितले जात आहे. प्रभाग अधिकारी हे अतिक्रमण नियंत्रण, फेरीवाला नियमन, स्वच्छता, नागरिकांच्या तक्रारी आणि विविध विभागांतील समन्वयासाठी महत्त्वाचे पद आहे.




त्यामुळे अशा जबाबदाऱ्यांसाठी पात्रता, अनुभव आणि सेवाज्येष्ठतेचे निकष कसे लागू केले जातात, हा प्रश्न आहे. महापालिका स्थापनेच्या सुरुवातीच्या काळात प्रशासकीय मनुष्यबळ मर्यादित असल्याने पनवेल नगरपरिषदेत काम केलेल्या अनुभवी कर्मचाऱ्यांवर विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या होत्या. त्यानंतर महापालिकेची प्रशासकीय यंत्रणा विस्तारली आणि विविध संवर्गांतील मनुष्यबळ उपलब्ध झाले. मात्र, जुन्याच पद्धतीने काही कर्मचाऱ्यांकडे महत्त्वाच्या जबाबदाऱ्या कायम आहेत का, याची चर्चा आता सुरू झाली आहे.

काही प्रभाग कार्यालयांत प्रत्यक्ष प्रशासकीय कामकाजात अधीक्षकपदावरील कर्मचाऱ्यांचा प्रभाव अधिक असल्याची चर्चा आहे. नागरिकांच्या तक्रारी, अतिक्रमणविरोधी कारवाई आणि फेरीवाला नियंत्रणासारख्या कामांत त्यांची भूमिका महत्त्वाची ठरत असल्यास अधिकृत अधिकार आणि प्रत्यक्ष जबाबदारी यामध्ये स्पष्टता असणे आवश्यक आहे. अरविंद पाटील हे गेल्या काही वर्षांपासून प्रभाग कार्यालयातील महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांवर कार्यरत असल्याचे सांगितले जाते. प्रभाग अधिकारी तसेच अधीक्षक म्हणून त्यांचा कार्यकाळ किती आहे आणि तो निर्धारित कालमर्यादेपेक्षा अधिक आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच, राजेश डोंगरे आणि मनोज चव्हाण या वरिष्ठ लिपिकांकडेही अधीक्षकपदाची जबाबदारी असल्याची चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर अमर पाटील यांची लिपिक संवर्गात कार्यरत असतानाच अतिक्रमणविरोधी विभागातील अधीक्षक म्हणून नियुक्ती झाल्याचे सांगितले जाते. अतिक्रमणविरोधी विभाग हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित असल्याने या विभागातील नियुक्त्यांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

- एकाच कर्मचाऱ्यांकडे वर्षानुवर्षे महत्त्वाची पदे?
- लिपिकांकडेच अधीक्षकपदाची जबाबदारी

### महापालिका क्षेत्रातील समस्या कायम

महापालिका क्षेत्रातील अनेक भागांत अतिक्रमण आणि फेरीवाल्यांचा प्रश्न कायम असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणामुळे वाहतुकीसह नागरिकांच्या दैनंदिन हालचालींवर परिणाम होत असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे अतिक्रमणविरोधी यंत्रणेची कार्यक्षमता आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी होत आहे. महापालिकेतील विविध पदांसाठी सेवाज्येष्ठता, पात्रता, अनुभव, पदोन्नती आणि नियुक्तीचे नियम आहेत. एखादा कर्मचारी आपल्या मूळ संवर्गापेक्षा वेगळ्या वरिष्ठ स्वरूपाची जबाबदारी दीर्घकाळ सांभाळत असेल, तर त्यासाठी कोणत्या नियमाचा आधार घेण्यात आला आहे, हे प्रशासनाने स्पष्ट करणे गरजेचे आहे.

दरम्यान, पनवेलचा झपाट्याने होत असलेला विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता प्रशासकीय यंत्रणा पारदर्शक आणि उत्तरदायी असणे आवश्यक आहे. त्यामुळे महत्त्वाच्या पदांवर ठरावीक कालावधीनंतर फेरबदल करून पात्र अधिकाऱ्यांना जबाबदारी देण्याची मागणी आता जोर धरत आहे. तसेच, महापालिका प्रशासनाने सर्व प्रभाग कार्यालयांतील प्रभाग अधिकारी, अधीक्षक आणि अतिक्रमणविरोधी विभागातील प्रमुखांची मूळ पदे, पात्रता, नियुक्तीची तारीख आणि संबंधित पदावरील कार्यकाळ जाहीर करावा, अशी मागणी होत आहे. त्यामुळे नियुक्त्यांबाबत सुरू असलेल्या चर्चेला वस्तुनिष्ठ उत्तर मिळू शकते.

## जयंत पाटील यांच्याकडून म्हात्रे कुटूंबियांचे सांत्वन

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुर्यकांत म्हात्रे (आप्पा) यांचे गुरूवारी (दि.१) निधन झाले. निधनासमयी ते ७५ वर्षांचे होते. सुर्यकांत म्हात्रे हे शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. थेरोंडा पानसेवाडी परिसरात पक्ष वाढीसाठी त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. ते राजकीय क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रात देखील सक्रीय होते. दरम्यान, शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी सोमवारी (दि.५) थेरोंडा पानसेवाडी येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन म्हात्रे कुटूंबियांची सांत्वनपर भेट घेतली. तसेच त्यांनी नितीन म्हात्रे, निलेश म्हात्रे यांच्यासह म्हात्रे कुटूंबियाची विचारपूस केली. यावेळी आप्पांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या पक्षनिष्ठ कार्याचा, साध्या-सरळ स्वभावाचा आणि सर्वांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या संबंधांचा आवर्जून उल्लेख करण्यात आला. याप्रसंगी कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होत, त्यांना धीर देत आप्पांची आठवण आणि त्यांनी केलेले कार्य सदैव आपल्या सोबत राहील, अशी भावना व्यक्त केली. यावेळी अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, रेवदंडा येथील शेकापचे ज्येष्ठ नेते सुरेश खोत, शेकापचे रेवदंडा शहर चिटणीस निलेश खोत, शरद पाटील, अभय ठाकूर, संगीता पाटील तसेच शोकाकूल नितीन म्हात्रे, निलेश म्हात्रे आणि त्यांचे कुटूंबिय उपस्थित होते.



## स्पायरल लॅडर्सला नागरिकांचा विरोध



| पोलादपूर | प्रतिनिधी |

पोलादपूर शहरातील पाच पुलांच्या बांधकामानंतर पूर्व आणि पश्चिमेच्या सर्व्हिस रोडवरील दोन्ही लेनला ओलांडून ये-जा करण्यासाठी पादचारी पूल उभारण्याची मागणी सुरु होती. आता पादचारी पूल बांधून झाल्यानंतर या पुलावर जाण्यासाठी पादचाऱ्यांना जिना चढून जावे लागणार असून, दोन्ही सर्व्हिस रोडवर चक्क स्पायरल लॅडर्स जोडण्यात येत आहेत. मात्र, या स्पायरल लॅडर्सचा उभा जिना चढायला लागणार असल्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

पोलादपूर शहराला पुर्व व पश्चिम भागांना जोडण्यासाठी पाच पादचारी पुलांची उभारणी करण्यात आली आहे. त्यानंतर सहाव्या पादचारी पुलाच्या मागणीने गेल्या काही वर्षांपासून जोर धरला होता. रास्ता रोको आणि पाठपुराव्यामुळे अल्पावधीतच या सहाव्या पादचारी पुलाच्या कामाला सुरुवात झाली. त्यावर तीन महिन्यांपूर्वी गर्डर टाकण्यात आले आणि काम थांबले. त्यानंतर अचानक चार दिवसांपूर्वी पुलाच्या पूर्व आणि पश्चिम सर्व्हिस रोडवरील पादचाऱ्यांना पुलावर जाण्यासाठी स्पायरल लॅडर्सचा जिना उभा करण्यात आला. परंतु, या जिन्याची रचना पाहून नागरिकांनी संताप व्यक्त केला. या पुलावर जाण्यासाठी उभारलेल्या जिना अत्यंत अरुंद आणि धोकादायक स्वरूपाचा असून, या जिन्यावरून लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षितपणे चढता येणार नसल्याने नागरिकांनी या कामाला विरोध केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सारिका विचारे यांनी तहसीलदार कपिल घोरपडे यांना लेखी निवेदन देऊन हे काम थांबविण्यासंदर्भात आवाहन केले. परिणामी, दिवसभर युद्धपातळीवर सुरू असलेले स्पायरल लॅडर्सचा जिना उभारण्याचे काम थांबविण्यात आले.

## स्मशानभूमीलगत आढळल्या बेवारस बॅगा

| चिरनेर | प्रतिनिधी |

खोपटा-कोप्रोली रस्त्याच्या कडेला असलेल्या पाटीलपाडा स्मशानभूमीलगत झाडाझुडुपांमध्ये सौंदर्य प्रसाधने असलेल्या २५ किलो वजनाच्या शेकडो बेवारस बॅगा आढळून आल्या आहेत. अज्ञातांनी चोरीच्या उद्देशाने लाखो रुपये किंमतीची सौंदर्य प्रसाधने या ठिकाणी टाकून दिली असावीत, अशी चर्चा सध्या नागरिकांमध्ये सुरू आहे.

मागील दोन दिवस खोपटा येथील पाटीलपाडा या स्मशानभूमीची रोड लाईटची वायर कोणीतरी तोडत असल्याचा प्रकार घडत आहे. त्यामुळे पाटील पाड्यातील नागरिकांनी रविवारी (दि.४) वायर दुरूस्तीसाठी विज कर्मचाऱ्याला त्या ठिकाणी घेऊन गेले असताना त्यांना हा प्रकार दिसून आला. मात्र, नेमका हा माल या ठिकाणी कोणी टाकला, याचा कोणताही सुगावा लागलेला नाही. त्या गोण्यांची पाहणी केली असता त्यावर इंग्रजीमध्ये बटाईल मेथॉक्सी डीबेंझोल मिथेन अवेबेंझोन असे नाव असून, त्यावर २०२८ ची एक्सपायरी तारीख आहे. ही प्रत्येक गोणी २५ किलोची असून, त्याला कोणत्याही प्रकाराचा वास येत नाही. असे असतानाही लाखोंच्या किंमतीची सौंदर्य प्रसाधने झाडाझुडुपांमध्ये टाकण्याचे प्रयोजन काय? अज्ञातांनी चोरीचा माल या ठिकाणी टाकला असावा, अशा शंका-कुशंकाही ग्रामस्थांकडून व्यक्त केल्या जात आहेत.



## बोर्लीपंचतन येथे गोवंशाची कत्तल

**श्रीवर्धन :** गोवंश प्राण्याची बेकायदेशीर कत्तल केल्याप्रकरणी दिघी सागरी पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई शुक्रवारी (दि.२) रात्रीच्या सुमारास बोर्लीपंचतन येथील नागाव मोहल्ला परिसरात करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, अमार अल्ताफ फोपलणकर (२१) याने स्वतःच्या घरात आणि पाठीमागील गल्लीत प्रतिबंधित गोवंशाची कत्तल करून त्याचे मांस बाळगले होते. या कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून ९ हजार २७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## डिजिटल अरेस्टच्या नावाखाली लाखोंचा चुना

**उरण :** तालुक्यातील धुतूम येथील सेवानिवृत्त कर्मचारी राजाराम ठाकूर यांच्याशी सायबर भामट्याने संपर्क साधून आपण पोलीस असल्याचे सांगितले. त्यानंतर व्हिडीओ कॉलवर गणवेशधारी पोलिसांचा धाक दाखवून ठाकूर त्यांना अक्षरशः घाबरवून सोडले. त्यांच्या नावाचा वापर महिलांचा व्यापार, अंमली पदार्थांची विक्री आणि मनी लाँडरिंगसारख्या गंभीर गुन्ह्यांत झाल्याचा बनाव रचण्यात आला. त्यांच्या मनात गंभीर गुन्ह्यात अटक होईल, पोलीस कारवाई होईल, अशी भीती निर्माण करण्यात आली. या कथित प्रकरणातून बाहेर पडायचे असेल तर सांगितलेल्या बँक खात्यांमध्ये पैसे जमा करावे लागतील, असा दबाव टाकण्यात आला. 'सुनीलकुमार गौत्तम' नावाच्या तोतया पोलिसाने ठाकूर यांना तब्बल १७ दिवस मानसिक दहशतीखाली ठेवले. यावेळी ठाकूर यांनी आरोपींच्या सांगण्याप्रमाणे तब्बल २५ लाख रुपये वेगवेगळ्या खात्यांमध्ये वळते केले. अखेर आपल्याविरुद्ध प्रत्यक्षात कोणताही गुन्हा नसताना आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी उरण शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## भाजी मंडई केव्हा सुरू होणार?

| पेण | प्रतिनिधी |

पेण नगरपालिकेने आरक्षण क्रमांक १४ मधील अंतिम भूखंड क्रमांक १०० व १०१ या जागेवर बीओटी तत्त्वावर भाजी मार्केटची उभारणी केली. मात्र, भाजी विक्रेत्यांसाठी उभारण्यात आलेल्या या मार्केटमधील गाळे जवळपास पाच वर्षे उलटूनही संबंधित विक्रेत्यांच्या ताब्यात देण्यात आले नसल्याने "भाजी मंडई सुरू कधी होणार?" असा संतप्त सवाल भाजी विक्रेत्यांकडून उपस्थित केला जात आहे.




ऑक्टोबर २०२१ मध्ये भाजी मार्केटच्या मागील बाजूस असलेले गाळे भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय त्रिसदस्यीय समितीने घेतला होता. या प्रक्रियेनुसार तळमजल्यावरील २४ आणि पहिल्या मजल्यावरील ३५ असे एकूण ५९ दुकानांचे गाळे, तसेच तळमजल्यावरील ३८ ओटे तीन वर्षांच्या मुदतीसाठी भाडेतत्त्वावर देण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर इच्छुक भाजी विक्रेत्यांकडून पाकीटबंद निविदा मागविण्यात आल्या. निविदा उघडल्यानंतर चढत्या दराने बोली लावणाऱ्या पात्र निविदाधारकांना गाळे देण्याची प्रक्रिया करण्यात आली. त्यामध्ये किमान सुमारे ४२ हजार रुपये ते कमाल ४८ हजार रुपयांपर्यंतची रक्कम, तसेच अमानत रक्कम घेण्यात आल्याचे भाजी विक्रेत्यांचे म्हणणे आहे. मात्र, कराराची मुदत आणि आर्थिक व्यवहाराची प्रक्रिया पूर्ण होऊनही अद्याप गाळेधारकांना प्रत्यक्ष गाळ्यांचा ताबा मिळालेला नाही. त्यामुळे अनेक विक्रेत्यांची मोठी आर्थिक कोंडी झाली आहे. काही भाजी विक्रेत्यांनी गाळ्याची अमानत रक्कम भरण्यासाठी कर्ज काढल्याचेही सांगितले जात आहे. गेल्या पाच वर्षांपासून कर्जाचे व्याज भरावे लागत आहे; मात्र, ज्या गाळ्यासाठी पैसे भरले तो गाळाच अद्याप ताब्यात मिळालेला नाही, अशी व्यथा विक्रेत्यांनी व्यक्त केली.

### भाजी विक्रेत्यांचा संतप्त सवाल

### अमानत रक्कम भरूनही फरफट

काळ्या डोंगरावर सोन्याची झालर | निसर्गाची किमया पाहण्यासाठी पर्यटकांची धाव

# माथेरानच्या डोंगराला 'सोनकी'चा साज

| कर्जत | प्रतिनिधी |

पावसाळा सरताना हरित तृणांची पसरलेली मखमालीचे डोंगर सर्वत्र दिसतात; मात्र, ऑक्टोबर महिन्यात माथेरानमध्ये निसर्गाची वेगळीच किमया पहावयास मिळते. माथेरान या डोंगरावर वसलेल्या पर्यटन स्थळावर पावसाळी हंगाम संपत असताना हिरव्यागार गवताच्या आजूबाजूला सोनकीच्या पिवळ्या धमक फुलांचा बहर वाढला आहे. त्यामुळे येथील अनेक हिरवेगार डोंगर पिवळा साज चढवून सोन्यासारखे दिसत आहेत. त्यामुळे माथेरानवर प्रेम करणारे काही दर्दी पर्यटक आणि निसर्गप्रेमी हे पिवळा धमक डोंगर आपल्या दृष्टीत साठविण्यासाठी माथेरानमध्ये येत आहेत.



पावसाळी पर्यटन हंगाम संपल्यानंतर ऑक्टोबरमध्ये निसर्गामध्ये आमूलाग्र बदल होताना हमखास दिसतात.परतीचा पाऊस झाल्यानंतर सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात सूर्यकिरण माथेरानच्या भूमीला स्पर्श करतात. काही ठिकाणी रिमझिम पाऊस त्यामध्ये डोंगरावर दिसणारे इंद्रधनुष्य पाहून पर्यटक अतिशय आनंदी होत असतात. मात्र, ऑक्टोबरमध्ये नवरात्रीच्या काही दिवस अगोदर माथेरानच्या सातशे हेक्टरमध्ये सभोवताली पिवळ्या फुलांनी डोंगराचे रुपडे पालटून जाते. या फुलांना सोनकी किंवा छोटे सुर्यफुल असे म्हणतात. माथेरानच्या डोंगरामध्ये असणारे सफेद फेसळालेले धबधबे, हिरवे गवत आणि त्यामध्ये आलेली ही सोनकी एक निसर्गाचे वरदानच आहे. ज्यावेळेस या सोनकीच्या फुलांवर सूर्यकिरण पडतात त्यावेळी संपूर्ण डोंगर हा सोन्यासारखा दिसतो. हे दृश्य अतिशय विलोभनीय असल्याने ज्या पर्यटकांना या महिन्याची किमया माहिती आहे ते आवर्जून पाहण्यासाठी माथेरानमध्ये येतात. नैसर्गिक आलेल्या या फुलांना सुगंध जरी नसला तरी लांब डोंगरावर ती फुलल्यावर सर्वत्र पसरल्यानंतर हिरव्या डोंगराचे पिवळ्या रंगामध्ये रूपांतर होते. हे दृश्य नवरात्री होईपर्यंत 'याची डोळा' पाहण्याची संधी पर्यटकांना मिळते. तसेच, या फुलांवर फुलपाखरांचे थवे बागडताना हमखास दिसतात. यावेळी फुलपाखरांसह चतुर यांच्यात स्पर्धा सुरू आहे की काय, असा भास देखील होतो. हा सोनाकीच्या फुलांचा आणि फुलपाखरांचा लपंडावाचा खेळ फक्त २० दिवस चालतो. त्यामुळे या दिवसांत निसर्ग अभ्यासक हे दृश्य अगदी जवळून न्याहाळतात. त्यानंतर ही सर्व फुले कोमेजून जातात आणि पुन्हा काही ठिकाणचा डोंगर हिरवा तर काही ठिकाणी पांढरा दिसू लागतो.

## उरणचे आनंदनगर अंधारात

| उरण | प्रतिनिधी |

गेल्या चार-पाच दिवसांपासून उरणच्या आनंद नगर परिसरातील स्ट्रीट लाईट बंद असल्याने रात्री नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यातच १५ ते २० भटकी कुत्री रात्रभर परिसरात फिरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे आहे. त्यामुळे "नावाला आनंद नगर, प्रत्यक्षात मात्र नरक नगर," अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे. स्ट्रीट लाईट बंद असल्याबाबत उरण तालुका मराठी पत्रकार संघाने यापूर्वीच पालिका प्रशासनाला लेखी पत्र देऊन तातडीने दिवे सुरू करण्याची मागणी केली होती. त्यानंतर काही दिवस दिवे सुरू झाले; मात्र, पुन्हा अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. पालिका प्रशासनाची ही 'दुरुस्तीची नौटंकी' नेमकी कधी थांबणार, असा सवाल नागरिक विचारत आहेत.



# चीन, जपान आणि भारत

जपानमध्ये पार पडलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी शेवटच्या क्षणी कामगिरी उंचावली. गेल्या वेळी चीनमध्ये झालेल्या स्पर्धेत २८ सुवर्णपदकांसह एकूण १०६ पदके मिळवण्याची विक्रमी कामगिरी केली होती. यावेळी एक वेळ अशी आली होती की आपल्याला जेमतेम १० सुवर्णपदके मिळतील असे वाटू लागले होते. पण शेवटच्या दोन दिवसात तब्बल ११ सुवर्णपदके मिळवून खेळाडूंनी लाज राखली. अखेर २१ सुवर्णपदकांसहित एकूण ८५ पदके मिळवून भारत चौथ्या क्रमांकावर आला. पहिल्या तीन क्रमांकांवर आशियातील तीन दादा देश आहेत. चीनने १६९ सुवर्णांसह तब्बल ३४१ पदके मिळवत पहिला क्रमांक मिळवला. गेल्या बारा स्पर्धांमध्ये चीनने आपला हा क्रमांक सोडलेला नाही. जपानला ८३ तर कोरियाला ३९ सुवर्णपदके मिळाली. जपानची एकूण पदकसंख्या २६९ तर कोरियाची १५० आहे. याचाच अर्थ भारताला अजून अजून किती मजल मारायची आहे हे स्पष्ट व्हावे. तरीही भारताच्या तरुण खेळाडूंनी व त्यातही मुलींनी जी कामगिरी केली त्याला तोड नाही. महाराष्ट्राच्या कुमकुम मोहोड हिचे नाव तर आज सर्वांच्या ओठावर आहे. अवघ्या १७ वर्षांच्या या मुलीने रिकर्व्ह या नेमबाजी प्रकारात सुवर्णपदक मिळवून सगळ्यांनाच चाट केले. या प्रकारात कोरियन खेळाडूंची दादागिरी आहे व गेली २८ वर्षे सातत्याने कोरियाने यामध्ये सुवर्णच नव्हे तर सर्व पदके जिंकली आहेत. पण यंदा कुमकुमने चमत्कार केला. या क्षेत्रातील सर्वोत्तम कोरियन व चिनी खेळाडूंचे तिच्यासमोर आव्हान होते. पण त्याचा अजिबात तणाव न घेता तिने आपली नैसर्गिक कामगिरी केली. विशेष म्हणजे आपल्या नेमबाजी संघानेही सुवर्णपदक जिंकले व त्यातही कुमकुम होती. तिथे सांघिक खेळ करण्याची व प्रत्येकाने ठराविक जबाबदारी पार पाडण्याची गरज होती. अशा रीतीने वैयक्तिक व सांघिक अशा दोन्ही आघाड्यांवर आपण उत्कृष्ट खेळाडू आहोत हे कुमकुने दाखवून दिले. कॉलेजात जेमतेम बारावीत असण्याच्या वयात असलेल्या कुमकुमने कोणतीही पार्श्वभूमी नसताना आणि या खेळाला क्रिकेट वगैरेसारखे ग्लॅमर नसताना जे यश मिळवले ते अद्भुत आहे.

## मुलींचे चमकदार यश

कुमकुम ही अमरावतीची आहे. तिचे वडील हे मिठाईचे खोके तयार करून विकण्याचा व्यवसाय करतात. तरीही तिला खेळाची आवड निर्माण झाली व घरच्यांनी तिला प्रोत्साहन दिले याबद्दल तिच्या पालकांचेही कौतुक करायला हवे. प्रफुल्ल डांगे यांनी तिला प्राथमिक प्रशिक्षण दिले. गेल्या काही महिन्यात ती अनेक जागतिक स्पर्धा खेळली व त्यातही तिने यश मिळवले होते. कुमकुमसारखी रत्ने भारताच्या खेड्यापाड्यात दडलेली आहेत. आमची आदिवासी मुले चिवटपणा, चपळपणा, लवचिकता यात कोणालाही हार जाणारी नाहीत. त्यांच्या गुणांना योग्य ते मार्गदर्शन व संधी मिळणे अत्यंत आवश्यक आहे हीच गोष्ट कुमकुमच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. महिलांच्या हॉकी स्पर्धेत मिळालेले यशही असेच नावाजण्यासारखे आहे. या संघाची कर्णधार सलीमा टेटे हिच्यासह ब्यूटी डुंगडूंग, दीपिका सोरेंग, निक्की प्रधान या चार खेळाडू झारखंडच्या आहेत. अब्जावधी भारतीयांना क्रिकेटपटूंची नावे तोंडपाठ असतात. पण या मुलींची नावे त्यांनी कधी ऐकलेली नसतात. फारसे पैसे किंवा संधी नसतानाही, अत्यंत मागास भागातून येऊन देशाच्या संघाला त्यांनी मिळवून दिलेले यश हे अद्वितीय आहे. विशेष म्हणजे अंतिम सामना चीनसारख्या बलाढ्य संघासोबत असतानाही त्यांनी यशाची लय हरवू दिली नाही. अशीच कहाणी ट्रॅप प्रकारात वैयक्तिक सुवर्णपदक मिळवणारी नीरू धांडा हिची आहे. तिने महिला सांघिक प्रकारात रौप्य आणि मिश्र सांघिक प्रकारात आणखी एक सुवर्णपदक मिळवले. परवीन हुडा हिने बॉक्सिंगमध्ये ६५ किलो वजनी गटात चीनमध्येही पदक जिंकले होते. पण नंतर डोप टेस्टमध्ये ती नापास ठरल्याने ते काढून घेण्यात आले होते. त्यामुळे तिच्यावर २२ महिन्यांची निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. पण डगमगून न जाता तिने मेहनत चालू ठेवली व यंदाच्या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. ही एखाद्या अद्भुत हिंदी सिनेमाची गोष्ट वाटावी अशीच कहाणी आहे. दुसरी बॉक्सर लवलिना बोर्गोहेन हिने गेल्यावेळी रौप्यपदक जिंकले होते. यंदा तिनेही सुवर्ण मिळवले.

## महाराष्ट्र कुठे आहे

कुस्ती हा भारताला हुकुमी पदके मिळवून देणारा प्रकार राहिला आहे. त्यात यंदा आपल्याला दोन सुवर्णासह सहा पदके मिळाली. सुजीत कलकल आणि अमर सेहरावत यांनी ऑलिम्पिक व जागतिक विजेत्यांना हरवून पदके पटकावली. इथे एक खेदाची गोष्ट नमूद करायला हवी. कुस्ती आणि कबड्डी हे महाराष्ट्राच्या क्रीडा संस्कृतीतील दागिने होते. पण या दोन्हीमध्ये आता राष्ट्रीय पातळीवर मराठी खेळाडू अपवादाने दिसतात. कुस्तीमध्ये बहुसंख्य खेळाडू हे हरियाणा, पंजाब किंवा उत्तर भारतातील आहेत. हिंदकेसरी, महाराष्ट्र केसरी वगैरेंची आपल्याकडे बरीच प्रसिध्दी होते. पण जागतिक स्पर्धांमध्ये भाग घेऊन आपला कस अजमावण्यात मराठी कुस्तीपटू तयार नसतात ही दुर्दैवाची बाब आहे. कबड्डीमध्येही भारताने उत्तम कामगिरी केली असली तरी महिला व पुरुष संघात जवळपास एकही मराठी खेळाडू नसतो. आता तरी या क्षेत्रातील क्रीडा संघटकांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे. भालाफेकीमध्ये नीरज चोप्रा याच्यावर आपल्या मोठ्या आशा होत्या. पण दुखापतींमुळे ऐन वेळी त्याने माघार घेतली. अर्थात गेल्या काही काळात नीरजला अपेक्षित कामगिरी करता आलेली नाही. ऑलिम्पिकमध्ये दोन पदके मिळवणारी मनू भाकर ही स्टार खेळाडूही अपयशी ठरली. बॅडमिंटनमध्ये सात्विक, शेट्टी, सिंधू यांच्यासारखे खेळाडू असूनही आपल्याला एकही पदक लाभले नाही. टेनिसमध्येही हेच घडले. चाळीस वर्षात आशियाई स्पर्धेत टेनिसमध्ये आपल्याला एकही पदक नसल्याचे यंदा पहिल्यांदाच घडले. पुरुष हॉकीमध्ये आपली कामगिरी कधी वर तर कधी खाली अशी असते. यापूर्वी विश्वचषक स्पर्धेत ही कामगिरी दारुण होती. पण यंदा हरमनप्रीतच्या संघाने सुवर्णपदक मिळवून लॉस एंजलिस ऑलिंपिकची पात्रता निश्चित केली आहे. गोल्फसारख्या श्रीमंती खेळात प्रणवी उर्स या मुलीने सुवर्णपदक मिळवून कमाल केली. क्रिकेट या खेळाच्या पलिकडेही आपल्या देशात क्रीडा क्षेत्रात तरुण मुलामुलींमध्ये प्रचंड टॅलंट आहे हे या स्पर्धांच्या निमित्ताने दिसत असते. यंदा आपल्या यशाचा आलेख खाली आला असला तरी या स्पर्धेपर्यंत धडक मारणाऱ्या खेळाडूंच्या व त्यांच्या प्रशिक्षकांच्या मेहनतीला कमी लेखण्याचे कारण नाही. चीन किंवा जपानमध्ये एथलेटिक्स, शारीरिक कसरती यांचे प्रशिक्षण खूप लहान वयापासून दिले जाते. गुणी मुले हेरली जातात व त्यांच्यावर प्रचंड मेहनत घेतली जाते. आपल्याकडे खेलो इंडियासारख्या कार्यक्रमाने हे प्रमाण वाढवले असले तरी बरेच काही करणे बाकी आहे. कुमकुम मोहोड किंवा नीरू धांडा यांच्यासारख्या असंख्य मुली व मुले आपल्या रायगड जिल्ह्यातही आढळतील. गरज आहे ती त्यांना योग्य प्रशिक्षण व प्रोत्साहन देण्याची. डॉक्टर, इंजिनिअर, उद्योगपती किंवा आयएएस अधिकारी होण्याइतकेच एखादा उत्तम खेळाडू होणे हेही तितकेच सन्मानाचे असायला हवे. आणि हे क्रिकेट नव्हे तर सर्व क्रीडा प्रकारात घडायला हवे.

विचार

# पाकिस्तानमध्ये सत्ता ‘रावळपिंडी’चीच!

**पाकिस्तानमध्ये सरकार कोणाचेही असो, सत्ता रावळपिंडीकडेच असते. पंतप्रधान, पक्ष, आघाड्या बदलतात; पण लष्कराचा राजकीय प्रभाव कायम राहतो. सध्या या समीकरणाच्या केंद्रस्थानी आहेत, लष्करप्रमुख असीम मुनीर. थलसेनाप्रमुख ते फिल्ड मार्शल आणि पुढे ‘चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ’ पदापर्यंत झालेली त्यांची वाटचाल पाकिस्तानमधील वेगाने बदलत्या सत्तासमीकरणाचे संकेत देते.**



आरिफ शेख

असीम मुनीर यांच्या हातात लष्करी सत्ता अधिकाधिक केंद्रीत होत असताना त्यांची राजकीय महत्त्वाकांक्षा किती दूरपर्यंत आहे, हा प्रश्न आता पाकिस्तानच्या राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. ते थेट अध्यक्षपदाकडे पाहत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. हा दावा स्वतंत्रपणे सिद्ध झाला नसला, तरी पाकिस्तानमधील घटनाक्रम पाहता तो पूर्णपणे दुर्लक्ष करण्यासारखाही नाही. कारण पाकिस्तानच्या इतिहासात लष्कराने राजकीय व्यवस्थेवर प्रभाव टाकण्याची अनेक उदाहरणे आहेत. आजचे आव्हान मात्र पूर्वीपेक्षा वेगळे आहे. जनरल अयुब खान, याह्या खान, झिया-उल-हक किंवा परवेझ मुशर्रफ यांच्या काळातील परिस्थिती आणि आजचा पाकिस्तान यामध्ये मोठा फरक आहे. थेट लष्करी उठाव करून सत्ता ताब्यात घेणे आता तितके सोपे राहिलेले नाही. देशांतर्गत राजकीय विरोध, आर्थिक संकट, जनमत, न्यायव्यवस्था, माध्यमे, आंतरराष्ट्रीय दबाव आणि बदललेले भू-राजकीय वातावरण यामुळे लष्करालाही आपली राजकीय भूमिका अधिक सावधपणे ठरवावी लागते. यामुळेच मुनीर यांच्यासाठी अध्यक्षपदाचा मार्ग हा थेट लष्करी सत्तेऐवजी घटनात्मक चौकटीतून सत्ता केंद्रीत करण्याचा पर्याय ठरू शकतो, अशी चर्चा सुरू झाली आहे. या सगळ्या समीकरणात अध्यक्ष आसिफ अली झरदारी यांची भूमिका महत्त्वाची ठरते. ‘पाकिस्तान पीपल्स पार्टी’ अर्थात ‘पीपीपी’ हा शाहबाज शरीफ सरकारचा महत्त्वाचा सहकारी पक्ष आहे. त्यामुळे झरदारी कुटुंबाचा राजकीय प्रभाव संपवणे म्हणजे केवळ अध्यक्ष बदलणे नव्हे, तर सत्ताधारी आघाडीच्या संपूर्ण समीकरणाला धक्का देणे होय. मुनीर यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेबाबतच्या चर्चेत म्हणूनच झरदारी हे संभाव्य अडथळा म्हणून पुढे येतात.

झरदारी यांनी नव्या प्रांतांच्या निर्मितीबाबत राष्ट्रीय सहमतीची गरज व्यक्त केली आहे. दुसरीकडे, पाकिस्तानमध्ये नव्या प्रांतांच्या निर्मितीचा मुद्दा पुन्हा तापत आहे. पंजाबचे विभाजन, सरायकी प्रांताची मागणी, सिंधच्या राजकारणातील ‘सिंधुदेश’चा मुद्दा आणि प्रशासकीय युनिट्सच्या पुनर्रचनेची चर्चा या सर्वांचा राजकीय परिणाम मोठा असू शकतो. प्रश्न केवळ प्रशासकीय पुनर्रचनेचा नाही. पाकिस्तानात प्रांत म्हणजे राजकीय शक्तीची केंद्रे आहेत. कोणत्या प्रांतात कोणत्या पक्षाचे वर्चस्व आहे, कोणत्या समाजघटकाचा राजकीय प्रभाव आहे आणि कोणाच्या हातात संसाधने आहेत, यावर सत्तेचे समीकरण ठरते. त्यामुळे प्रांतांचे विभाजन हा निर्णय नकाशावर रेषा आखण्याइतका साधा विषय नाही. पाकिस्तानच्या राजकारणात पंजाबचे महत्त्व सर्वाधिक आहे. लोकसंख्या, आर्थिक ताकद आणि लष्करी भरतीतील मोठा वाटा यामुळे पंजाबचे राजकारण राष्ट्रीय सत्तेवर थेट परिणाम करते. त्यामुळे पंजाबचे विभाजन झाले, तर विद्यमान राजकीय समीकरणे बदलू शकतात. सरायकी प्रांताची मागणी ही अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे. ‘पीएमएल-एन’, ‘पीपीपी’ आणि इतर पक्षांनी वेळोवेळी या मागणीबाबत वेगवेगळ्या भूमिका घेतल्या आहेत; पण प्रश्न असा आहे की, पंजाबचे विभाजन झाले तर त्याचा सर्वाधिक राजकीय फायदा कोणाला होईल? याच ठिकाणी मुनीर यांच्या महत्त्वाकांक्षेबाबतच्या चर्चेला राजकीय अर्थ प्राप्त होतो. एकीकडे पंजाबमधील पारंपरिक राजकीय वर्चस्वाला धक्का देण्याची संधी तर दुसरीकडे केंद्रातील सत्तेवर लष्करी प्रभाव वाढवण्याची शक्यता या दोन्ही गोष्टी एकत्र आल्यास पाकिस्तानचे राजकारण पूर्णपणे नव्या दिशेने जाऊ शकते;

असे असले तरी अशा घडामोडींमुळे उभा राहू शकणारा धोकादेखील तेवढाच मोठा आहे. प्रांतांचे विभाजन स्थानिक अस्मिता आणि भाषिक ओळखींना अधिक तीव्र करू शकते. पाकिस्तान आधीच बलुचिस्तान, खैबर पख्तुनख्वा आणि सिंधमधील असंतोषाशी झुंजत आहे. अशा परिस्थितीत प्रशासकीय पुनर्रचनेच्या नावाखाली राजकीय हस्तक्षेप झाला, तर असंतोष कमी होण्याऐवजी वाढण्याची शक्यता आहे. ‘पीपीपी’साठी सिंध हा केवळ एक प्रांत नाही, तर पक्षाच्या राजकीय अस्तित्वाचा मुख्य आधार आहे. त्यामुळे सिंधच्या विभाजनाची चर्चा झाली, की ‘पीपीपी’ सावध होणे स्वाभाविक आहे. ‘एमक्यूएम’ आणि इतर सिंधी राजकीय प्रवाहांच्या पार्श्वभूमीवर सिंधचे राजकारण आधीच अत्यंत संवेदनशील आहे. एका बाजूला स्वतंत्र ‘सिंधुदेश’ची मागणी करणारे प्रवाह आहेत, तर दुसरीकडे सिंधची प्रादेशिक ओळख टिकवण्याचा आग्रह आहे. अशा वेळी सिंधचे विभाजन करण्याची कोणतीही कल्पना व्यापक राजकीय संघर्षाला जन्म देऊ शकते. यामुळेच ‘पीपीपी’ आणि लष्करी आस्थापनेमध्ये तणाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही; मात्र या तणावाला ‘मुनीर विरुद्ध झरदारी’ अशी सरळ रेषा देणेही धोकादायक ठरेल. पाकिस्तानमधील राजकारण अनेक स्तरांवर चालते. येथे प्रत्येक पक्ष एकाच वेळी मित्र आणि प्रतिस्पर्धी असू शकतो. या संपूर्ण राजकीय पटावर शरीफ कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ‘पाकिस्तान मुस्लिम लीग-नवाज’ अर्थात ‘पीएमएल-एन’ आणि लष्कर यांचे संबंध इतिहासात अनेकदा बदलले आहेत. कधी सहकार्य, कधी संघर्ष आणि कधी परस्पर गरजेचे राजकारण असे या संबंधाचे स्वरूप राहिले आहे.

आजचा प्रश्न असा आहे, की ‘पीएमएल-एन’ला मजबूत नागरी सरकार हवे आहे की लष्कराच्या मदतीने राजकीय प्रतिस्पर्ध्यांना नियंत्रणात ठेवणे अधिक सोयीचे वाटते? इमरान खान यांच्या राजकीय आव्हानानंतर शरीफ कुटुंबासमोर मोठे आव्हान निर्माण झाले. इमरान यांचा प्रभाव पूर्णपणे संपवणे शक्य झालेले नाही, तर ‘पीपीपी’ सारख्या मित्रपक्षांची स्वतःची राजकीय महत्त्वाकांक्षा आहे. अशा परिस्थितीत लष्कराशी संघर्ष टाळणे हे ‘पीएमएल-एन’ साठी राजकीयदृष्ट्या सोयीचे ठरू शकते; परंतु लष्कराला जास्त राजकीय शक्ती देण्याची किंमत भविष्यात ‘पीएमएल-एन’लाही चुकवावी लागू शकते. पाकिस्तानच्या इतिहासात हे वारंवार घडले आहे. लष्कराला राजकीय समीकरणात निर्णायक भूमिका देणारे नागरी नेते शेवटी स्वतःच त्या प्रभावाचे बळी ठरले आहेत. नव्या प्रांतांच्या निर्मितीसाठी २८व्या घटनादुरुस्तीची चर्चा होत असल्याचे दावे समोर येत आहेत. अशी घटनादुरुस्ती प्रत्यक्षात पुढे आली, तर ती पाकिस्तानच्या संघराज्य रचनेत मोठा बदल घडवून आणू शकते; पण कोणतीही घटनादुरुस्ती हा केवळ संसदेत बहुमत मिळवण्याचा विषय नाही. त्यामागे व्यापक प्रादेशिक सहमती असणे आवश्यक आहे. विशेषतः प्रांतांच्या सीमांमध्ये बदल होत असतील, तर संबंधित प्रांतातील राजकीय आणि सामाजिक शक्तींचा सहभाग अनिवार्य ठरतो. याच कारणामुळे झरदारी यांचे ‘राष्ट्रीय सहमतीशिवाय स्थायी समाधान होऊ शकत नाही’ हे म्हणणे महत्त्वाचे आहे. ते केवळ घटनात्मक तत्त्व मांडत आहेत, की त्यामागे ‘पीपीपी’ च्या राजकीय हिताचे संरक्षण करण्याचा प्रयत्न आहे, हे काळच स्पष्ट करेल.

आसिफ मुनीर पाकिस्तानचे अध्यक्ष होतील की नाही हा आत्ताचा महत्वाचा प्रश्न नाही. खरा प्रश्न आहे, पाकिस्तानमध्ये नागरी सत्ता आणि लष्करी सत्ता यांच्यातील सीमारेषा नेमकी कुठे आहे? लष्करप्रमुखाकडे सैन्याची सर्वाधिक ताकद एकवटत गेली आणि त्याच वेळी राजकीय निर्णयप्रक्रियेत त्यांचा प्रभाव वाढत गेला, तर घटनात्मक लोकशाहीचा अर्थच बदलतो. अध्यक्ष बदलला, पंतप्रधान बदलला किंवा प्रांतांची संख्या वाढली, तरी सत्तेचे केंद्र एकाच संस्थेकडे राहिले, तर व्यवस्थेच्या मूलभूत समस्येवर उपाय योजला जाणार नाही. पाकिस्तानला आज सत्ता अधिक केंद्रीत करण्याची गरज नाही, तर संस्थात्मक संतुलन मजबूत करण्याची गरज नाही. संसद, न्यायपालिका, निवडणूक आयोग, माध्यमे आणि प्रांतीय सरकारे यांना त्यांच्या घटनात्मक अधिकारांनुसार काम करू दिले गेले पाहिजे. लष्कराने राष्ट्रीय सुरक्षेची जबाबदारी पार पाडावी आणि राजकीय सत्तेचा निर्णय मतदारांवर सोपवावा, हीच लोकशाहीची मूलभूत अट आहे. मुनीर यांच्याबाबत सुरू असलेल्या चर्चेचा शेवट राष्ट्राध्यक्षपदात होईल की नाही, हे आज सांगणे घाईचे ठरेल; पण त्यांच्या हातात वाढत जाणारी लष्करी सत्ता आणि त्याभोवती सुरू असलेले राजकीय ध्रुवीकरण पाकिस्तानसाठी नक्कीच चिंतेचा विषय आहे. प्रांतांचे विभाजन झाले, तरी पाकिस्तानमधील सत्तासंघर्ष संपणार नाही. उलट, आणखी गुंतागुंतीचा होऊ शकतो. पंजाब, सिंध, बलुचिस्तान आणि खैबर पख्तूनख्वा यांच्या अस्मिता, संसाधने आणि राजकीय आकांक्षा यांना दुर्लक्षित करून कोणताही बदल टिकणार नाही.

चर्चा आजची

# वकृत्वातून मिळाले हक्काचे व्यासपीठ

प्रमोद जाधव

शेतकऱ्यांचे कैवारी स्व.नारायण नागू पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील, विरोधी पक्षनेते ॲड. स्व. दत्ता पाटील यांच्याकडून मिळालेला सामाजिक व राजकीय वारसा जपण्याचे काम शेकापच्या ज्येष्ठ नेत्या, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई पाटील यांनी केला. शालेय जीवनापासूनच त्यांनी राजकारणाचे धडे गिरविण्यास सुरुवात केली होती. राजकारणासह पत्रकारिता क्षेत्रातही काही काळ त्यांनी काम केले. त्यांना वाचनाची प्रचंड आवड होती. त्यामुळे त्यांचे वकृत्व समृध्द होते. आपल्या वकृत्वाची एक वेगळी छाप त्यांची राहिली आहे. यांच्या आठवणींना उजाळा देण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये वाचन, अभ्यास, विचार मांडण्याची क्षमता आणि प्रभावी वक्तृत्व विकसित व्हावे, या उद्देशाने शेकापच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतून असंख्य वक्ते निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमातून हक्काचे व्यासपिठ मिळवून देण्याचा प्रयत्न शेतकरी कामगार पक्षाने केला.

शेतकरी, कामगार, कष्टकरी जनतेच्या न्याय हक्कासाठी लढा देणाऱ्या, महिलांचे प्रश्न सातत्याने विधी मंडळात मांडणाऱ्या शेकापच्या नेत्या, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांचे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रात मोलाचे योगदान राहिले आहे.आपल्या राजकीय कारकिर्दीत तळागाळातील प्रश्न अभ्यासू वृत्तीने सातत्याने मांडण्याचे काम स्व.मीनाक्षी पाटील यांनी केले आहे. विधिमंडळात अभ्यासपूर्ण भाषणे आणि आक्रमक भूमिका ही त्यांची विशेष ओळख होती. स्व. मीनाक्षी पाटील यांच्या सार्वजनिक जीवनात वकृत्व, नेतृत्व आणि सामाजिक प्रश्नांवरील सातत्यपूर्ण भूमिका यांना विशेष महत्त्व होते.

शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या, माजी राज्यमंत्री स्व.मीनाक्षी पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त शेतकरी कामगार पक्ष,पुरोगामी विद्यार्थी संघटना, पुरोगामी युवक संघटना, सांस्कृतिक आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हास्तरिय खुली वकृत्व स्पर्धा अलिबागमधील शेतकरी भवन येथे शनिवारी(दि.३)आयोजित करण्यात आली.शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख



उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी शेकाप ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे,कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक,जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, तालुका चिटणीस सुरेश घरत, तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, तालुका माजी चिटणीस अनिल शांताराम पाटील, शेतकरी संघटनेचे अनिल पाटील, नागेश कुलकर्णी, अलिबाग पंचायत समिती सदस्य अंजली ठाकूर, तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, मोहन धुमाळ, विक्रांत वार्डे, निलेश खोत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातील असंख्य स्पर्धक, श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेत एकूण ५० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.आजचा विद्यार्थी आणि उद्याचा भारत, रायगडचा विकास आणि जनतेची अपेक्षा, सत्तेच्या सिंहासनावर नव्हे, जनतेच्या हृदयात घर करणारी ताई- मीनाक्षीताई, कलम जब जागती है तब सत्ता कांपती है, मजबुती का नाम महात्मा गांधी, जखमी लोकशाहीच्या कपाळावर आशेचे कुंकू लावतीय मी अशा वेगवेगळ्या विषयांवर वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेकांनी वेगवेगळ्या विषयांवर आपल्या शैलीतून वकृत्व करून श्रोत्यांची मने जिंकली.परिक्षक म्हणून राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य भगवान लोखंडे, साहित्यिक लेखक आनंद कोळगांवकर, एमए विषयातील सुवर्ण पदकाचे मानकरी आणि मराठी भाषेवर प्रभूत्व असणाऱ्या सुरभी वाणी तसेच समिक्षक म्हणून प्रशांत कृष्णा पाटील यानी काम पाहिले. स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या अलिबागमधील संयोगी नाईक या विजेत्याला पंधरा हजार एक रुपये व चषक, द्वीतीय क्रमांक मिळविणाऱ्या अमिषा भगत यांना अकरा हजार एक रुपये व चषक, तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या जान्हवी हातमोडे यांना सात हजार एक रुपये व चषक, चतुर्थ क्रमांक मिळविणाऱ्या श्रवण कदम यांना पाच हजार एक आणि चषक, पाचवा क्रमांक मिळविणाऱ्या सानिका घरत यांना तीन हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच ध्रुव राऊत, पंकज पांडोळे, अपुर्वा पिंगळे, हिंदवी मोरे, प्रार्थना बेटकर या पाच जणांना उत्तेजनार्थ म्हणून दोन हजार रुपये व चषक देऊन सन्मानित करण्यात आले. या सर्व विजेत्याचा सन्मान शेकाप ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, कामगार आघाडीचे प्रमुख प्रदिप नाईक, तालुका चिटणीस सुरेश घरत, रेवदंजडा शहर चिटणीस निलेश खोत, पुरोगामी युवक तालुका प्रमुख विक्रांत वार्डे, निवेदक संदीप जगे, विद्यार्थी संघटनेचे जिल्हा प्रमुख हर्ष ढवळे, तालुका प्रमुख वेदांत कंटक, वैशाली पाटील, शेतकरी कामगार पक्ष,पुरोगामी विद्यार्थी संघटना, पुरोगामी युवक संघटना, सांस्कृतिक आघाडीचे सर्व पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, स्पर्धक, श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शेकाप पुरोगामी विद्यार्थी संघटना, पुरोगामी युवक संघटना, सांस्कृतिक आघाडीचे सर्व पदाधिकारी, सदस्यानी प्रचंड मेहनत घेतली. सकाळपासून सुरु झालेली ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्याठी उत्तम नियोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, ॲड.मानसी म्हात्रे, तालुका चिटणीस सुरेश घरत, संदीप जगे, निलेश खोत,अनिल शांताराम पाटील,अनिल गोमा पाटील, प्रणित गुरव यांनी मोलाचे योगदान दिले.

लोकसंसद

## भारताची आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी यशस्वी

युक्रेन व रशिया यांचे युद्ध गेली अनेक वर्षे चालू आहे अद्यापर्यंत ते युद्ध थांबविण्यात कोणत्याही राष्ट्राला यश आले नाही. साहजिकच आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता व सलोखा लाभणे कठीण होत चालले आहे. युक्रेन देशाला सुद्धा रशिया सारख्या बलाढ्य देशाशी सामना द्यावा लागत आहे. या युद्धात भारताची मध्यस्ती यशस्वी होण्याची चिन्हे दिसत आहेत. अलीकडच्या काही महिन्यात भारताने केवळ भूमिका मांडण्या ऐवजी मोठ्या प्रमाणात प्रयन्त चालविले आहेत. भारताचे परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनी या बाबत नुकतेच भाष्य केले आहे. रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी काही दिवसापूर्वी भारताचे पंतप्रधान मोदी यांच्या कडे हे युद्ध थांच्या अनेक कल्पना असल्याचे म्हटले होते. विशेष म्हणजे रशियाच्या या प्रतिक्रिये बरोबर युक्रेन ने सुद्धा भारताच्या पुढाकाराला संमत्ती दिली आहे. त्यामुळे युक्रेन व रशिया या मधील दीर्घकाळ चाललेल्या युद्धाला ब्रेक मिळेल आज भारताची मुत्सद्देगिरी जगात कामी आली. १९५० पासून आंतरराष्टीय पातळीवर रशियाने अनेक वेळा भारताला पाठींबा दिला आहे १९७१ साली बंगला देश युद्धाच्या वेळी रशियाने आपला पाठींबा जाहीरपणे भारताला दिला होता आजही जागतिक पातळीवर पेट्रोल व गॅसचा तुटवडा भासत आहे या अत्यंत महत्वाच्या वेळी रशियाने आपणास तेलाचा पुरवठा करून मोलाची मदत केली होती. आज जागतिक पातळीवर मोदी यांचे मोठे महत्व आहे. जगातील ३६ देशांनी पंतप्रधान मोदी यांना सवोच्च पारितोषिके देऊन सन्मान केला आहे. जगात भारताच्या भूमिकेला अत्यंत किंमत आहे. हे पंतप्रधान मोदी यांचे यश आहे.

**– शांताराम वाघ, पुणे**

दिनविशेष

# सांगली आकाशवाणी केंद्राची स्थापना

६ ऑक्टोबर १९६३ हा दिवस महाराष्ट्रातील आकाशवाणी इतिहासात महत्त्वाचा आहे. याच दिवशी पुण्याच्या आकाशवाणी केंद्राचे सांगली उपकेंद्र सुरू झाले. त्या काळात मनोरंजनासाठी दूरदर्शन नसल्याने रेडिओच लोकांसाठी मुख्य माध्यम होते. घराघरात, हॉटेलांत आणि सार्वजनिक ठिकाणी रेडिओ लागलेला असे.

१९६३ मध्ये, लोकांना रेडिओच्या माध्यमातून नवनवीन कार्यक्रम ऐकायला मिळत होते. सांगली उपकेंद्र पुणे आकाशवाणीचेच एक उपकेंद्र होते, ज्याचे प्रसारण सुरुवातीला २४० मीटर (१२५० किलोसायकल्स) वरून केले जात होते. नंतर हे प्रसारण २३९.८१ मीटर (१२५१ किलोहर्टझ्)




वर बदलले. सांगलीजवळच्या तुंग येथे असलेल्या ट्रान्समीटरमध्ये कार्य सुरू झाले आणि त्यावेळी प्रसारण इतके स्पष्ट होते की ते गोवा, कर्नाटकातील काही भागांमध्येही ऐकू जात होते. या केंद्रावर जपानमधील ङ्गनिपॉनफ ट्रान्समीटर वापरले जात, परंतु काही वर्षांनी देशी बनावटीचे भेलचे ट्रान्समीटर बसविण्यात आले.

१९८५ मध्ये कोल्हापूर रोडवर एक नवीन आकाशवाणी स्टुडिओ इमारत बांधली गेली.

त्या सुवर्णकाळात आकाशवाणीवर मराठी साहित्यिक आणि संगीत क्षेत्रातील मोठमोठी माणसे कार्यरत होती. पु. ल. देशपांडे, मंगेश पाडगावकर, वेंकटेश माडगूळकर यांच्यासारखी साहित्यिक मंडळी नियमितपणे आकाशवाणीवर येत असत. सुधीर फडके यांचे अजरामर ङ्गङ्गगीत रामायणफ्फ अशाच एका प्रसारणाचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे.

मधुकर गोळवलकर यांच्या ङ्गङ्गजयोस्तुते श्री महन् मंगलेफ्फ या गीताच्या रेकॉर्डिंगवेळी संपूर्ण स्टुडिओ संगीतकार आणि गायकांनी भरून गेला होता, ज्यामुळे त्यांना बाहेरच्या पॅसेजमध्ये उभे करावे लागले होते. या गोष्टींनी आकाशवाणीची ऐतिहासिक महती सिद्ध होते.

आकाशवाणीवर काम करताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत होते. सांगलीहून तुंगला प्रसारण सुरू करण्यासाठी कर्मचाऱ्यांना पहाटे चार वाजता निघावे लागत असे. तेव्हा रेडिओवरून कधी-कधी सार्वजनिक जीवनाशी संबंधित आव्हानात्मक निवेदनेही प्रसारित होत. एकदा कोल्हापूरच्या छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पिटलमधून रक्तासाठी एक आकस्मिक निवेदन करावे लागले होते. या निवेदनामुळे अनेक रक्तदाते मदतीला आले आणि संबंधित मुलीचे प्राण वाचले.

रेडिओ फक्त एक मनोरंजनाचे साधन नव्हते; ते लोकांच्या जीवनाशी जवळून जोडलेले होते. एका गरीब वृद्ध चर्मकाराने रेडिओवर ऐकलेल्या निवेदनावरून एका निवेदकाला आपल्या हातांनी चप्पल बनवून देण्याची विनंती केली होती. ही एक घटना आहे जिच्यामुळे रेडिओच्या माध्यमातून लोकांशी कसे दयाळू आणि सखोल नाते जुळले होते, हे कळते. पुणे आकाशवाणी केंद्राचे सांगली उपकेंद्र आजही इतिहासाच्या पानांमध्ये सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. १९६३ चा हा क्षण मराठी संस्कृतीचा अभिमान आहे, ज्याने नवनवीन साहित्यिकांना आणि कलाकारांना एक व्यासपीठ दिले. रेडिओवर प्रसारित झालेल्या आठवणी आणि कार्यक्रम आजही अनेकांच्या मनात जिवंत आहेत.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**६ ऑक्टोबर**

१) श्रीम.रोहिणी चंद्रकांत वडे
मु.थळबाजार, अलिबाग
दि.६-१०-१९५०

२)श्री.लक्ष्मण नामदेव म्हात्रे
मु.कोप्रोली, अलिबाग
दि.६-१०-१९५२

३)श्री.राघव भिवा गुरव
मु.वेश्वी, अलिबाग
दि.६-१०-१९४६

४)श्री.अनिल वसंत मराठे
वरसोली, अलिबाग
दि.६-१०-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक,कृषीवल

**आजचे अन्नदाते**

**विश्वनाथ (विलास) निगळ्ये, ठाणे**

**कै. वसंत मुकुंद गोडबोले स्मरणार्थ अलिबाग**

**कै. भगवान बालाजी साने, स्मरणार्थ अलिबाग**

**श्रीमती सुरेखा हरिश्चंद्र चव्हाण, अलिबाग**

## रेल्वे रुळानजीक अज्ञाताचा मृतदेह

**रत्नागिरी :** कोकण रेल्वे मार्गावरील कोंडिवली रेल्वे रुळानजीक बुधवारी रात्री व्यक्तीचा मृतदेह आढळला. रेल्वेतून पडल्यामुळे किंवा रेल्वे रुळ ओलांडताना त्याचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. याबाबत माहिती मिळताच कोकण रेल्वे सुरक्षा दलासह स्थानिक पोलीस प्रशासनाने घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. याप्रकरणी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू नोंद करण्यात आली आहे.

# नवीन पनवेलचा पाणीप्रश्न कायम

■ सहा महिन्यांचे आश्वासन फेल
■ नागरिकांचा संतप्त

**| खांदेश्वर | प्रतिनिधी |**

नियोजित शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवीन पनवेलमध्ये ऐन सणासुदीत पाण्यासाठी नागरिकांची धावपळ सुरू आहे. सेक्टर १३ आणि सेक्टर १८ परिसरातील रहिवाशांना गेल्या सुमारे १५ दिवसांपासून पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, अनेकदा नळाला पाणीच येत नाही. पाणी आले तरी अत्यंत कमी दाबाने येत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन गरजाही भागत नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे ‘टँकरमुक्त नवीन पनवेल’ नेमके दिसणार कधी, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे मुबलक पाणी उपलब्ध असल्याचे सांगितले जात असतानाही नवीन पनवेलमध्ये नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

अनेक वर्षांपासून नवीन पनवेलचा पाणीप्रश्न कायम असून, प्रत्येक वेळी आश्वासने आणि बैठका होतात; मात्र प्रत्यक्षात परिस्थिती जैसे थेच राहत असल्याची भावना रहिवाशांमध्ये आहे. पनवेलकरांना आगामी काळात मुबलक पाणीपुरवठा केला जाईल, अशी आश्वासने वेळोवेळी दिली जातात. बैठका होतात, चर्चा होतात आणि ‘सहा महिन्यांत पाणीप्रश्न सुटेल’ अशा बातम्याही प्रसिद्ध होतात. मात्र नागरिकांचा साधा सवाल आहे. हे सहा महिने नेमके कोणत्या तारखेपासून सुरू झाले आणि संपणार कधी?



नागरिकांना आश्वासन नव्हे, तर नियमित आणि पुरेशा दाबाने पाणी हवे आहे. त्यामुळे पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी नेमकी कोणती कामे सुरू आहेत, ती कधी पूर्ण होणार आणि त्यासाठीची अंतिम तारीख कोणती, हे प्रशासनाने स्पष्ट करावे, अशी मागणी होत आहे.

### टँकरच्या बिलावरून सोसायट्यांमध्ये वाद

नळाला पुरेसे पाणी मिळत नसल्याने अनेक सोसायट्यांना टँकर मागवावे लागत आहेत. टँकरचे वाढते बिल भरण्यावरून सोसायट्यांमध्ये मतभेद आणि वाद निर्माण होत असल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. घराचा देखभाल खर्च, वीजबिल आणि इतर खर्च सांभाळताना पाण्यासाठी अतिरिक्त पैसे मोजावे लागत असल्याने रहिवाशांवर आर्थिक भार पडत आहे. पनवेलमध्ये दीड-दोन कोटी रुपये खर्च करून घर घेणाऱ्या कुटुंबांनाही जर पिण्यासाठी टँकरचे पाणी विकत घ्यावे लागत असेल, तर नियोजित शहराच्या मूलभूत सुविधांबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक असल्याचे नागरिक सांगतात.

### टँकरमुक्त शहर कधी दिसणार?

पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर सिडको आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून एकमेकांकडे जबाबदारी ढकलली जात असल्याची नागरिकांची तक्रार आहे. मात्र नागरिकांना पाणी कोण पुरवते, यापेक्षा नियमित, पुरेशा दाबाने आणि वेळेवर पाणी मिळणे महत्त्वाचे आहे. नवीन पनवेलमधील पाणीप्रश्न आता केवळ १५ दिवसांची तात्पुरती समस्या राहिलेली नाही. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा कधी निघणार, टँकरमुक्त नवीन पनवेल कधी दिसणार आणि ‘सहा महिन्यांत मुबलक पाणी’ या आश्वासनाचे सहा महिने नेमके कधी संपणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# श्रीवर्धनला वाहनतळाची प्रतीक्षा

■ मठाचा गवंड, शासकीय विश्रामगृह मार्गावर वाहतूक कोंडी



**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीवर्धन शहरात मोठ्या संख्येने पर्यटक दाखल होत असतात. परंतु नगरपरिषदेचे वाहनतळ नसल्याने वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनत आहे. शहरात येणारे पर्यटक वाहनतळाची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे समुद्रकिनाऱ्यालगत मिळेल त्या मोकळ्या जागेत आपली वाहने उभी करीत आहेत. परिणामी मठाचा गवंड आणि शासकीय विश्रामगृह मार्गावर वारंवार वाहतूक कोंडी होत असून स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनाही याचा त्रास सहन करावा लागत आहे.

श्रीवर्धन शहर पर्यटनाच्या दृष्टीने आधुनिकतेकडे वाटचाल करीत असताना मूलभूत सुविधांपैकी महत्त्वाची असलेली वाहनतळाची सुविधा मात्र अद्याप उपलब्ध झालेली नाही. विशेषतः पर्यटन हंगामात वाहनांची संख्या वाढल्याने रस्त्याच्या कडेला अस्ताव्यस्त पद्धतीने वाहने उभी केली जातात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याबरोबरच रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते.

नगरपरिषदेने शहराच्या भविष्यातील वाढत्या पर्यटनाचा विचार करून वाहनतळासाठी योग्य जागेची निवड करून आवश्यक नियोजन, पार्किंग व्यवस्था आणि वाहतूक नियंत्रणाची सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

‘‘श्रीवर्धन आधुनिक पर्यटनस्थळ म्हणून विकसित होत असताना वाहनतळासारखी मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे ही गंभीर बाब आहे. नगरपरिषदेने याबाबत लवकरात लवकर ठोस निर्णय घेऊन वाहनतळाची सुविधा उपलब्ध करून द्यावी,’’ अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# विजय तांबडकर पुरस्काराने सन्मानित



**कोर्लई :** मुरुड नांदगाव येथील विजय चंद्रकांत तांबडकर यांना ‘निसर्गोपचार गौरव सन्मान -२०२६’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बुलडाणा येथे आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन व एजीएमए आणि योग निसर्गोपचार चिकित्सक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ‘मिशन विजय’ अंतर्गत क्रीडा आणि आरोग्य क्षेत्रात आपला आगळावेगळा ठसा उमटविणारे मास्टर विजय तांबडकर यांना मे महिन्यात ‘एस.एम.इ. आंतरराष्ट्रीय पुरस्कार-२०२६’ने सन्मानित करण्यात आले होते. सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा, आरोग्य व शिक्षण क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तसेच क्रीडा आणि आरोग्य असा दुहेरी संगम करून नवीन पिढीला याचं महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी अनेक वर्षे सेवा दिली.

# नर्सिंग महाविद्यालयाचे यश

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यातील नांदगावच्या नूतन स्कूल ऑफ नर्सिंग व जीएनएम नर्सिंग परीक्षेत १०० टक्के निकाल मिळवून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले. या महाविद्यालयाने वैद्यकीय-शल्यक्रिया, बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य नर्सिंग या प्रात्यक्षिक परीक्षांमध्येही १०० टक्के निकाल लागला आहे. सन २००५ मध्ये स्थापन झालेली एनएसएन ही परिसरातील जुन्या व प्रतिष्ठित नर्सिंग शिक्षण संस्थांपैकी एक आहे. आतापर्यंत संस्थेतून १,०००हून अधिक जीएनएम आणि एएनएम विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून विविध शासकीय, महामंडळ तसेच खासगी आरोग्य संस्थांमध्ये कार्यरत आहेत.

एनएसएनमध्ये ३ वर्षांचा जीएनएम नर्सिंग आणि ४ वर्षांचा बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रम उपलब्ध असून विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज वसतिगृह, कॅन्टीन आणि २४७ सुरक्षा व्यवस्था उपलब्ध असून ही संस्था आयएसओ प्रमाणित असून रायगड जिल्ह्यातील पहिली आयएसओ प्रमाणित नर्सिंग संस्था आहे. नूतन स्कूल ऑफ नर्सिंग, नांदगाव येथे प्रवेश प्रक्रिया सध्या सुरू असून प्रवेशाची अंतिम तारीख ३० ऑक्टोबर असून नर्सिंग क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर महाविद्यालयास भेट देऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रा. प्रकाश कुमार मुदियप्पनावर यांनी केले आहे.

# वरवठणे गावात स्वच्छता अभियान



**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील विद्या संकुलातील एसएसओएसपी कॉलेज ऑफ डिप्लोमा इंजिनीअरिंग यांच्या वतीने शुक्रवारी (दि.२) राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना रॅली व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

कॉलेज परिसरातील वरवठणे गावात आयोजित करण्यात आलेल्या या स्वच्छता अभियानात महाविद्यालयाचे प्रा.डॉ. प्रवेश यादव, इलेक्ट्रिकल विभाग प्रमुख ज्योती पालवे, मेकॅनिकल विभाग प्रमुख विशाल पाटील, कॉम्प्युटर आणि आर्टिफिशियल विभाग प्रमुख सागर सुरेकर, प्रथम वर्ष सिव्हिल विभागप्रमुख मनोरमा साखरे, प्रथम वर्ष विभागप्रमुख नीलम पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ही सद्भावना रॅली डिप्लोमा इंजीनियरिंग महाविद्यालयापासून वरवठणे ग्रामपंचायत कार्यालयापर्यंत काढण्यात आली. यावेळी उपस्थितांना स्वच्छता, कचरा व्यवस्थापन याचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच याच दिवशी भाएसोच्या विद्या संकुलातील श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक रुग्णालयाच्या सहकार्याने ग्रामस्थांसाठी आरोग्य शिबीरही राबवण्यात आले.

# करिअर मार्गदर्शन शिबिरासह छायाचित्र प्रदर्शन

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

पेण येथील कारमेल कॉन्व्हेंट स्कूलच्या इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांसाठी रसायनी (मोहोपाडा) येथील पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्समध्ये एकदिवसीय करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक शाखा आणि रोजगाराच्या संधींची माहिती देण्यात आली. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या छायाचित्रांचे भव्य प्रदर्शन भरविण्यात आले होते.



शिबिरात महाविद्यालयातील प्राध्यापक आणि तज्ज्ञांनी विज्ञान, वाणिज्य, कला, माहिती तंत्रज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील करिअरच्या संधींचे दृकश्राव्य माध्यमातून सादरीकरण केले. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. योग्य करिअर निवडीसाठी या मार्गदर्शनाचा लाभ झाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. दरम्यान, कला, वाणिज्य, विज्ञान आणि वास्तुकला विभागांतील विद्यार्थ्यांनी टिपलेल्या छायाचित्रांच्या प्रदर्शनात निसर्गसौंदर्य, शहरी जीवन, मानवी भावना, वन्यजीव आणि रसायनी परिसरातील नयनरम्य दृश्ये मांडण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. डिजिटल युगात छायाचित्रणातूनही करिअरच्या संधी उपलब्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# योगेश सरावते यांना पुरस्कार

**रसायनी :** रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार योगेश बाळू सरावते यांना पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय आणि दीर्घकालीन कार्याची दखल घेत ‘राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार २०२६’ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. त्यांच्या सामाजिक बांधिलकी, जनहिताच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडण्याच्या कार्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. योगेश सरावते हे कर्जत शहरातील नाना मास्तर नगर परिसरातील रहिवासी असून त्यांचे शिक्षणही कर्जत येथे झाले आहे. सुशिक्षित, सामाजिक भान जपणारे आणि जनसामान्यांच्या प्रश्नांशी जोडलेले पत्रकार म्हणून त्यांनी रायगड जिल्ह्यात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. ‘जप जीवाला बहुउद्देशीय संस्था’ यांच्या वतीने योगेश सरावते यांना सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. या सन्मानपत्रात त्यांच्या सामाजिक बांधिलकी, जबाबदारीने केलेले पत्रकारितेचे कार्य तसेच विविध माध्यमांतून समाजाच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचा गौरव करण्यात आला आहे.



माणगाव ते ढालघर फाट्यापर्यंत वाहनांच्या रांगा | सलग सुट्ट्यांमुळे वाहतूक व्यवस्थेची पुन्हा परीक्षा

# पादचारी रस्त्यावर वाहनांचे अतिक्रमण

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शहरातील वाहतूक कोंडीची समस्या रविवारी (दि.४) सायंकाळी पुन्हा एकदा गंभीर स्वरूपात समोर आली. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर माणगाव शहरापासून थेट ढालघर फाट्यापर्यंत सुमारे सात किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने संपूर्ण वाहतूक व्यवस्था अक्षरशः ठप्प झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. रस्त्यावर वाहनांची गर्दी आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी धडपडणारे पादचारी, हे दृश्य माणगावच्या वाहतूक



समस्येची तीव्रता अधोरेखित करणारे ठरले.

माणगाव शहराच्या प्रवेशद्वाराजवळ परिस्थिती आणखी बिकट झाली होती. एकाच लेनमध्ये वाहनांच्या अनेक रांगा लागल्याने वाहने अत्यंत संथगतीने पुढे सरकत होती. काही वाहनांना काही अंतर पार करण्यासाठीही बराच वेळ लागत होता. त्यामुळे वाहनचालक, प्रवासी, स्थानिक नागरिक आणि पादचारी यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. वाहतूक कोंडी वाढत गेल्याने पादचाऱ्यांसाठी स्वतंत्रपणे चालण्याची जागाच उरली नाही. तीनचाकी, दुचाकी आणि छोट्या चारचाकी वाहनांनीही कोंडीतून पुढे जाण्यासाठी पादचारी मार्गाचा आधार घेतल्याचे अनेक ठिकाणी दिसून आले. काही ठिकाणी वाहने पदपथावरच उभी राहिल्याने पादचाऱ्यांसमोर आणखी मोठी अडचण निर्माण झाली. वाहनांच्या गर्दीतून सुरक्षितपणे पुढे जाण्यासाठी जागा न मिळाल्याने पादचाऱ्यांना रस्त्याच्या कडेला असलेल्या दाट झाडी-झुडपांतून वाट काढत पुढे जावे लागले.

### अपुऱ्या वाहतूक व्यवस्थेचा परिणाम

मुंबई-गोवा महामार्गावरील रखडलेली कामे आणि अपुऱ्या वाहतूक व्यवस्थेचा परिणाम पुन्हा एकदा जाणवला. माणगाव परिसरात वाहतूक कोंडीची समस्या नवीन नाही. मात्र, रस्त्यावर वाहनांना जागा नाही आणि पादचाऱ्यांना चालण्यासाठीही सुरक्षित मार्ग नाही, अशी परिस्थिती निर्माण होणे ही चिंतेची बाब आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने किंवा इतर अत्यावश्यक सेवांची वाहने या कोंडीत अडकली तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### उपाययोजनांची आवश्यकता

माणगाव शहरातून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर निर्माण झालेल्या या अभूतपूर्व कोंडीने वाहतूक नियोजनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. गर्दीच्या दिवसांसाठी स्वतंत्र वाहतूक आराखडा, महत्त्वाच्या ठिकाणी अतिरिक्त वाहतूक पोलीस, वाहनांच्या मार्गाचे प्रभावी नियमन, पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग आणि महामार्गावरील रखडलेली कामे तातडीने पूर्ण करणे, या उपाययोजनांची आवश्यकता निर्माण झाली आहे.

## निवडक



### महात्मा गांधी जयंती उत्साहात

**अलिबाग :** लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाच्या प्राचार्या लीना पाटील यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्या लीना पाटील यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधीजींचे जीवन, कार्य आणि सत्य, अहिंसा, स्वच्छता व स्वावलंबन या विचारांचे महत्त्व पटवून दिले. गांधीजींचे विचार हे केवळ इतिहासाचा भाग नसून आजच्या पिढीला जबाबदार नागरिक म्हणून घडविणारे जीवनमूल्य आहेत. सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणता येते, हा गांधीजींचा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या आचरणातून पुढे न्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सचिन गोंधळी, प्रा. सुजाता पाटील, प्रा. रवींद्र म्हात्रे, आय.क्यू.ए.सी कोऑर्डिनेटर श्रद्धा पाटील तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमात ५४ राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

### कोंडलेतील पाण्याची टाकी धोकादायक



**खांदेश्वर :** पनवेल तालुक्यातील खैरवाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कोंडले गावातील पाण्याची टाकी सध्या जीर्ण अवस्थेत असून, ती पडण्याच्या स्थितीत असल्याने ग्रामस्थांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. टाकीच्या बांधकामाला ठिकठिकाणी तडे गेले असून, भिंतींची अवस्था चिंताजनक झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. गावातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी उभारण्यात आलेली ही टाकीच आता धोकादायक बनली आहे. टाकीच्या परिसरात नागरिकांची तसेच लहान मुलांची वर्दळ असते. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. टाकी कोसळल्यानंतर प्रशासनाला जाग येणार का? असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित ग्रामपंचायत आणि प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन टाकीची संरचनात्मक तपासणी करून सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य उपाययोजना कराव्यात, अशी नागरिकांची मागणी आहे.



### अभिषेक विचारेंच्या कादंबरीचे प्रकाशन

**म्हसळा :** रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्याचे सुपुत्र तथा लेखक अभिषेक भास्कर विचारे यांच्या ‘प्रेमाची वाट पाहणारी मुलगी’ या कादंबरीचा प्रकाशन सोहळा मुंबईतील टायटल वेव्हज, वांद्रे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रसंगी महाराष्ट्राच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, वेदांती तटकरे, मुंबई महानगरपालिका नगरसेविका राजुल पाटील, म्हसळा नगराध्यक्ष सुनील शेडगे, पंचायत समिती सभापती बबन मनवे, उपसभापती लहुशेठ म्हात्रे, जि. प. सदस्य अनिल बसवत, संतोष (नाना) सावंत, महेश घोले, किरण पालांडे, संदिप चाचले, महेश शिर्के आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी अभिषेक विचारे यांच्या प्रेमाची वाट पाहणारी मुलगी या साहित्यिक वाटचालीचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील लेखनासाठी शुभेच्छा दिल्या. या पुस्तकातून मानवी भावना, प्रेम, नातेसंबंध आणि जीवनातील भावनिक संघर्ष यांचा लेखनाच्या माध्यमातून वेध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील विविध जबाबदाऱ्या सांभाळत असतानाही अभिषेक विचारे यांनी साहित्यलेखनाची आवड जोपासत आपल्या अनुभवांना शब्दरूप दिले आहे. त्यामुळे या कादंबरीकडे केवळ एक साहित्यकृती म्हणून नव्हे, तर त्यांच्या साहित्यिक प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून पाहिले जात आहे. पुस्तकप्रेमी, हितचिंतक आणि साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी अभिषेक विचारे यांना शुभेच्छा देत त्यांच्या साहित्यिक प्रयत्नांचे कौतुक केले.



### राजाराम जाधव तालुका अध्यक्षपदी

**पाताळगंगा :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, शाखा खालापूर तालुकाध्यक्षपदी राजाराम भगवान जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जिल्हा परिषद शाळा खालापूर येथे झालेल्या बैठकीत नूतन तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्यांनी १९ जून १९९५ रोजी रायगड जिल्हा परिषद शाळा वाजापूर, पनवेल येथे शिक्षक म्हणून सेवेला सुरुवात केली. या शाळेत त्यांनी तीन वर्षे विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे दिले. त्यानंतर खालापूर, माजगाव, धामणी, कुंभिवली आणि वडवल येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये त्यांनी अध्यापनाचे कार्य केले. सध्या ते जिल्हा परिषद शाळा कलोते रयती येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. गेल्या ३१ वर्षांपासून ज्ञानदानाच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी घडले असून, अनेकजण विविध क्षेत्रांत तर काही सरकारी सेवेत उच्च पदांवर कार्यरत आहेत. त्यांच्या शैक्षणिक प्रवासातून शिक्षकाचे समाजातील महत्त्व अधोरेखित होते. नूतन कार्यकारिणीत तालुकाध्यक्ष राजाराम जाधव, तालुका कार्यवाह डॉ. अजय देशमुख, तालुका कार्याध्यक्ष अमसिद्ध बिराजदार, तालुका कोषाध्यक्ष भारत आढे, तालुका संघटनमंत्री प्रदीप चव्हाण आणि तालुका महिला आघाडी प्रमुख रेखा जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, जिल्हा अध्यक्ष उदय गायकवाड, जिल्हा कार्यवाह विजय पवार, राज्य प्रसिद्धीप्रमुख वैभव कांबळे, निरीक्षक जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र खामकर, महेंद्र पाटील यांच्या माध्यमातून ही अध्यक्षपदाची निवड करण्यात आली.

## निवडक



## जयवंत पाटील यांना राज्यस्तरीय 'गुणवंत शिक्षक' पुरस्कार

**अलिबाग** : अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील रायगड जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षक जयवंत पाटील यांना अविष्कार फाऊंडेशन, कोल्हापूर यांच्याकडून 'राज्यस्तरिय गुणवंत शिक्षक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पाटील यांनी शिक्षक म्हणून काम करत असतानाच त्यांनी परहूरपाडा विभाग सामाजिक, शिक्षण, क्रीडा क्षेत्रात भरीव काम केली आहे. त्यांचीच पोहच पावती म्हणून त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. तसेच यांनी त्यांच्या सेवाकाळात अलिबागसह मुरुड, पोलादपूर, महाड या तालुक्यांत एकूण २९ वर्ष सेवा केलेली आहे. रायगड जिल्ह्यातील नामांकित असलेल्या प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. अलिबागचे संचालक तथा व्हाईस चेअरमन म्हणून देखील त्यांनी काम पाहिले आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ शाखा रायगडचे उपाध्यक्ष तसेच सध्या महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषद शाखा अलिबागचे कार्यवाहक म्हणून ते काम पाहत आहेत. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल परहूरपाडा विभागातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच खंडाळा-नेहुलीच्या विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच शाळा व्यवस्थापन समिती-नेहुली यांनी त्यांचा सन्मान केला आहे. रायगड जिल्यातील अनेक शिक्षक बंधू-भगिनींकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांना हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे मित्रमंडळ व नातेवाईकांकडून समाधान व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## तळा तालुक्यात पावसाची प्रतीक्षा

**तळा :** तळा तालुक्यात खरीप हंगामातील प्रमुख पिके भात व नाचणी यांची लागवड पूर्ण झाली असून एकूण १२४०.२१ हेक्टर क्षेत्रावर पीक डोलत आहे. दरम्यान, अल्प प्रमाणात भाजीपाला, वरई आणि बांधावरील पिकेही घेण्यात आली आहेत. मात्र, पुढील काळात जोरदार पाऊस न झाल्यास उत्पादनावर परिणाम होण्याची भीती कृषी विभागाने व्यक्त केली जात आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, आत्तापर्यंत हलक्या सरींमुळे पीक परिस्थिती समाधानकारक आहे. परंतु या पुढे पावसाने उघडीप दिल्यास दाणे भरण्याच्या अवस्थेतील



पिकाला फटका बसू शकतो. पावसाअभावी खोडकिडा, करपा आणि कडा करपा या किड-रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांमार्फत गावोगावी मार्गदर्शन सुरू आहे. जुलैमधील अतिवृष्टीने ११ हेक्टर रोपवाटिका वाहून गेल्या होत्या. आम्ही तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना रोहू पद्धतीने लागवडीचे मार्गदर्शन केले. सध्या पीक चांगले आहे, पण पुढील १५ दिवसांत चांगला पाऊस झाला नाही तर उत्पादनात २०-२५ टक्के घट येऊ शकते. शेतकऱ्यांनी पिकांवर लक्ष ठेवावे असे तालुका कृषी अधिकारी हनुमंत कांबळे यांनी सांगितले. यंदा वेळेवर लागवड झाली, पीकही चांगले आले आहे. पण आता भाताला पाणी हवे आहे. पाऊस नाही आला तर औषधाचा खर्च वाढेल, अशी प्रतिक्रिया शेतकरी दिनेश बटावले यांनी दिली.



## कॅन्सर जनजागृतीसाठी कार रॅली

**खारेपाट** : बाल कॅन्सर व महिलांमधील कॅन्सरबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने लायन्स क्लब ऑफ खोपोली आणि अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.१) खोपोली ते अलिबाग 'ड्राईव्ह फॉर होप-ऑल वुमन्स कार ड्राईव्ह' या महिला कार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीद्वारे लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३१ ए ४ मधील रिजन १ व रिजन २ च्या ऑक्टोबर सर्व्हिस वीकचे भव्य लॉन्चिंग करण्यात आले. या रॅलीत सुमारे ३० कार सहभागी झाल्या होत्या. यावेळी कॅन्सर व बाल कॅन्सर जनजागृतीपर संदेशांनी सजविलेल्या या कारमधून महिलांनी खोपोली ते अलिबाग हा प्रवास अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पूर्ण केला. रॅलीदरम्यान वेगमर्यादा, वाहतूक नियम व इतर सूचनांचे काटेकोर पालन करण्यात आले. बेस्ट कार डेकोरेशन आणि बेस्ट स्लोगन यांसाठी विशेष पुरस्कारही ठेवण्यात आले होते. या उपक्रमाची संकल्पना लायन्स क्लब ऑफ खोपोलीच्या अध्यक्षा लायन शैली मेहता यांची होती. अलिबाग येथे याच उपक्रमाचा भाग म्हणून कॅन्सर जनजागृती बाईक रॅलीचेही आयोजन करण्यात आले. अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरून सुरू झालेली बाईक रॅली शहरातील विविध मार्गांवरून मार्गक्रमण करत पीएनपी नाट्यगृह येथे पोहोचली.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे: रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन २ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (३ जागा), ओरिएंटल कुक १ जागा, इंडियन चायनीज कुक १ जागा, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा WhatsApp वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२

● **झेरॉक्स दुकानात मराठी टायपिंगसाठी** मुलगी पाहिजे. संपर्क : ९९२१५५०१२९

● **Vacancy for Store Manager in furniture Store** Experience in Sales - 5+ years, Salary - 40,000 per Mouth, Location Zirad. Contact - 9823585321

● **Vacancy in Furniture Factory as a office boy/girl,** Education - Graduation, Experience 3-4 years,Salary 20,000 per month, Location : Bamansure, Chondli. Contact - 9823585321.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# उल्हास नदीला गढूळ पाणी

## खडकांवरही लालसर रंगाचे थर; गाळाची तपासणी करण्याची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

खंडाळा बोर घाटात उगम पावणारी उल्हास नदी मागील काही दिवसांच्या गढूळ पाण्यामुळे चर्चेत आली होती. या गढूळ पाण्याबद्दल उल्हास नद्या बचाव समितीचे वतीने अभ्यास सुरू केला आहे. या गढूळ पाणी प्रकरणाची वैज्ञानिक तपासणी करण्याची मागणी केली आहे. दरम्यान उल्हास नदी बचाव समितीच्या वतीने संपूर्ण उल्हास नदी परिसराची पाहणी केल्यावर ही मागणी केली आहे.

सप्टेंबर महिन्याचे अखेरीस फारसा पाऊस झालेला नसताना उल्हास नदीचे पाणी गढूळ झाले होते. त्यानंतर उल्हास नदी बचाव समितीचे वतीने नदीचे उगम स्थान पासून कोंढाणे लेणी परिसर, पेज नदीकाठ, टॉरंट पॉवरप्लॉट परिसर, सावरगाव रेल्वे यार्ड तसेच वावे, वांजळे, बेंडसे, दहीवली, आवळस, नेवाळी, कोल्हारे, धामोते, शेलू, बांधिवली आणि खारवडी आदी भागांचीही पाहणी करण्यात आली. चिल्हार, उल्हास आणि पेज नदीच्या विविध ठिकाणांहून पाण्याचे नमुने घेऊन त्यांची तुलनात्मक



तपासणी करावी. तसेच नदीतील लालसर गाळ, नदीकाठची माती आणि उत्खननातील माती यांचेही वैज्ञानिक परीक्षण करावे, अशी मागणी केली आहे.

या पाहणी दरम्यान डोंगरकटिंग, मोठ्या प्रमाणातील वृक्षतोड, मातीचे विस्थापन, नदीकाठावरील बांधकामे आणि नदीत वाहून येणारा गाळ आढळून आला. विशेषतः कर्जतजवळील पिंपळोळी परिसरातील चिल्हार नदीकाठावर सुमारे १८० एकर क्षेत्रातील प्लॉटिंग प्रकल्पाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात डोंगरकटिंग आणि वृक्षतोड झाल्याचे पाहणीत दिसून आले आहे. या भागातील डोंगराचा नैसर्गिक उतार बदलल्याने काही ठिकाणी माती घसरणे आणि भूस्खलनासारखी परिस्थिती दिसून आली. मुसळधार पावसात ही लालसर माती व गाळ चिल्हार नदीत आणि पुढे उल्हास नदीत वाहून येत आहे का, हा आता तपासाचा महत्त्वाचा मुद्दा आहे.

विशेष म्हणजे चिल्हार नदीच्या पाण्यासोबत नदीतील दगड आणि खडकांवरही लालसर थर आढळल्याचे समितीने सांगितले. त्यामुळे हा नैसर्गिक गाळाचा परिणाम आहे की अन्य कारणामुळे पाण्याचा रंग बदलला आहे, याची वैज्ञानिक तपासणी आवश्यक आहे. या ठिकाणी सुरू असलेल्या विविध बांधकामांमधून माती अथवा गाळ नदीत मिसळतो आहे का, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**वैज्ञानिक पुरावा शोधण्याची मागणी**

उल्हास नदी लाल का झाली? स्रोत शोधल्याशिवाय प्रश्न संपणार नाही आणि वैज्ञानिक पुरावा समोर येईपर्यंत शोध थांबणार नाही, अशी भूमिका उल्हास नदी बचाव कृती समितीने घेतली आहे.

तालुक्यात सुरू असलेल्या भागाची वैज्ञानिक तपासणीची मागणी केली आहे. त्या पाहणीत पिंपळोळी परिसरातील डोंगरकटिंग आणि मातीचे विस्थापन हे लालसर गाळाच्या संभाव्य स्रोतांपैकी एक असल्याचे समितीने म्हटले आहे. मात्र, वैज्ञानिक जलनमुना तपासणी शिवाय कोणत्याही एका प्रकल्पाला दोषी ठरविणे योग्य नसल्याचेही समितीने स्पष्ट केले.

या पाहणी दौरा दिलीप कपोते फाऊंडेशनच्या डॉ. कल्पना (राणी) कपोते यांच्या पुढाकाराने शशिकांत दायमा यांच्या सहकार्याने झाला. यावेळी रविंद्र लिंगायत, अशफाक शेख, प्रशांत राऊत, हरेश सोनावळे, मोहन भागवत, तसेच उल्हास नदी बचाव कृती समितीचे सदस्य उपस्थित होते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महसूल, वन, जलसंपदा विभाग, स्थानिक प्रशासन तसेच संबंधित प्रकल्प आणि रेल्वे प्रशासनाने संयुक्त पाहणी करून डोंगरकटिंग, वृक्षतोड, नदीकाठावरील बांधकामे आणि माती व्यवस्थापना संदर्भातील परवानग्यांची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# खैरे खुर्द उर्दू शाळेला नवी वास्तू

- दोन महिन्यांत लोकार्पणाचा तटकरे यांचा शब्द
- पाणी, आरोग्य, रोजगार व पर्यटन सुरक्षेलाही प्राधान्य

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील खैरे खुर्द येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या सुमारे ३७ लाख रुपये खर्चाच्या नवीन इमारतीचा भूमीपूजन सोहळा खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते झाला. गेल्या तीन-चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या कामाला तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर सुरुवात झाली असून, नाताळच्या सुट्टीपूर्वी इमारतीचे लोकार्पण करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही तटकरे यांनी दिली.

दोन मजल्यांची ही इमारत देखणी आणि दर्जेदार असावी, तसेच विद्यार्थ्यांना प्रेरणादायी वातावरण मिळावे, अशी अपेक्षा तटकरे यांनी व्यक्त केली. स्ट्रक्चरल ऑडिट व तांत्रिक परवानग्यांमुळे काम रखडले होते. आता प्रक्रिया पूर्ण झाल्याने कामाला गती देण्याच्या सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



यावेळी तटकरे यांनी म्हसाडी धरणाचा प्रश्नमार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. धरणामुळे पाणीपुरवठ्यासोबत परिसराचा विकास व रोजगारनिर्मितीला चालना मिळू शकते, असे त्यांनी सांगितले. दिवेआगर, हरिहरेश्वर, काशीद व अलिबागसह समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

स्थानिक युवकांना रोजगार मिळावा यासाठी प्रदूषणमुक्त उद्योग, कौशल्यविकास प्रशिक्षण, शेतीपूरक व्यवसाय, लघुउद्योग व प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. मच्छिमारांचा पारंपरिक व्यवसाय टिकवण्यावरही त्यांनी भर दिला. वनविभागाच्या परवानग्या व तांत्रिक अडचणींमुळे रखडलेल्या रस्त्यांची कामे मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

खैरे खुर्द परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेणार असून, पुढील काही महिन्यांत भूमीपूजनासाठी पुन्हा येण्याचा शब्द तटकरे यांनी दिला.

या कार्यक्रमाला राजिप उपाध्यक्ष मधुकर पाटील, विजया पाशिलकर, मनोजकुमार शिंदे, रामचंद्र सकपाळ, संजय माडलुस्कर, हरीचंद्र वाजंत्री, मुजम्मील गिते, नितीन डबिर, अतिश मोरे, तेजस्विनी वाजंत्री, संतोष भौड यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.



# नागोठण्यातील भातगिरणी संस्थेची सभा उत्साहात

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठणे विभाग सहकारी भातगिरणी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संस्थेच्या सभागृहात खेळीमेळीच्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. संचालक मंडळाचे कुशल मार्गदर्शन आणि कर्मचारी वर्गाच्या मेहनतीमुळे संस्थेचे कामकाज प्रगतिपथावर आहे. संस्था आगामी काळात संस्थेची आर्थिक व प्रशासकीय प्रगती साधून संस्थेला 'अ' वर्गात आणण्यासाठी संचालक मंडळ सर्वतोपरी प्रयत्न करेल, असा विचवलास सभापती सदानंद गायकर यांनी व्यक्त केला.

या वार्षिक सर्वसाधारण सभेला सभापती सदानंद गायकर, भाई टके, शिवरामभाऊ शिंदे, मधुकर ठमके, मारुती देवरे, कृष्णा धामणे, अनंत वाघ, खंडू ठाकूर, लहू तेलंगे, ॲड. महेश पवार, संस्थेचे सचिव अनिल पवार यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य तसेच शेतकरी पुरुष व महिला सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कौटुंबिक हिंसाचाराला न्यायालयाचा दणका

**। उरण । प्रतिनिधी ।**

कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणात उरण न्यायालयाने महत्त्वपूर्ण आदेश देत पीडित पत्नीला दरमहा १५ हजार रुपये पोटगी व निर्वाह भत्ता, तर मुलीच्या पालनपोषणासाठी दरमहा ५ हजार रुपये देण्याचे आदेश दिले आहेत. तसेच पती, सासू आणि सासऱ्यांनी पीडित महिलेविरुद्ध कौटुंबिक हिंसाचार अथवा तत्सम कोणतेही कृत्य करू नये, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.उरण न्यायालयातील फौजदारी किरकोळ अर्ज कविता म्हात्रे यांनी दि.२३ डिसेंबर, २०२१ रोजी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अंतर्गत दाखल केले होते. यावेळी अर्जदारांच्यावतीने सादर करण्यात आलेले पुरावे, साक्षी आणि जबाब विचारात घेतल्यानंतर उरण येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग जी.के.आर. तंडन यांनी दि.१ ऑक्टोबर रोजी आदेश पारित केला. न्यायालयासमोर आलेल्या पुराव्यांच्या आधारे कौटुंबिक हिंसाचाराबाबत अर्जदाराची बाजू सिद्ध झाल्याचे नमूद करत न्यायालयाने संरक्षण व आर्थिक मदतीसंदर्भात आदेश दिले.

# शासकीय पोर्टलवर तालुका म्हणून पालीचा उल्लेख

## प्रशासकीय निष्काळजीपणाविरोधात तीव्र असंतोष

**। पाली । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमिकरण अभियान या उपक्रमांतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी सध्या ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू आहे. मात्र, महाआयटीच्या अधिकृत पोर्टलवर अर्ज करताना रायगड जिल्हा निवडल्यानंतर तालुक्याच्या यादीत सुधागड ऐवजी पाली असा पर्याय दाखवला जात आहे. शासनाच्या या अक्षम्य चुकीमुळे संपूर्ण सुधागड तालुक्यात तीव्र असंतोष पसरला असून, तालुक्याच्या अस्मितेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पाली हे सुधागड तालुक्याचे मुख्य प्रशासकीय आणि मुख्यालय असले, तरी तालुक्याचे अधिकृत नाव सुधागड असेच आहे. यापूर्वीही जिल्हा प्रशासनाकडून निघणाऱ्या आपत्ती व्यवस्थापन किंवा इतर शासकीय परिपत्रकांमध्ये वारंवार सुधागड ऐवजी पाली असा चुकीचा उल्लेख करण्यात आला होता. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी वेळोवेळी लक्ष वेधूनही ही चूक सुधारण्याऐवजी आता थेट शासनाच्या अधिकृत ऑनलाइन पोर्टलवरच पाली असा तालुक्याचा उल्लेख केल्याने स्थानिक नागरिक संताप व्यक्त करत आहेत. जिल्हा प्रशासन आणि संबंधित महाआयटी विभागाने या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन पोर्टलवरील ही चूक सुधारावी. तसेच, जिल्हाधिकारी कार्यालयातून होणाऱ्या सर्व शासकीय पत्रव्यवहारात सुधागड तालुक्याचाच योग्य आणि अधिकृत उल्लेख केला जावा, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे. भविष्यात सुधागडचे ऐतिहासिक नाव प्रशासकीय दप्तरावरून पुसले तर जाणार नाही ना, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

> जिल्हा प्रशासनाकडून होणाऱ्या अनेक पत्रव्यवहारांमध्ये सुधागड ऐवजी पाली असा तालुक्याचा उल्लेख केला जातो. पाली हे तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे; मात्र, तालुका सुधागड आहे. याचा विसर प्रशासनाला वारंवार पडत आहे. लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी अनेकदा प्रशासनाला याची जाणीव करून दिली, तरीही ही चूक सुधारली गेली नाही.
>
> – निलेश शिर्के, सामाजिक कार्यकर्ते, सुधागड

# खांदा वसाहतीच्या उद्यानातील हाय मास्ट बंद

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

खांदा वसाहतीतील सेक्टर ६ येथील उद्यानात सुशोभीकरण आणि विद्युत रोषणाईसाठी लाखो रुपये खर्च करण्यात आले आहेत. मात्र, त्याचा नागरिकांना अपेक्षित फायदा मिळत नसल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. उद्यानातील आकर्षण ठरणारे फुलपाखराच्या आकाराचे दिवे अधूनमधूनच सुरू होत असल्याने रात्रीच्या वेळी परिसरात अंधुक प्रकाश दिसून येतो.

उद्यानात बसविण्यात आलेला हायमास्ट दिवाही अनेक



महिन्यांपासून बंद असल्याची नागरिकांची तक्रार आहे. तसेच सुशोभीकरणासाठी लावण्यात आलेले विविध दिवेही पुरेसा प्रकाश देत नसल्याने उद्यानातील अनेक भाग अंधारात राहतात. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी, व्यायामासाठी आणि विरंगुळ्यासाठी येणाऱ्या नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

उद्यानात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असले, तरी परिसरातच पुरेसा प्रकाश नसेल तर एखादी घटना घडल्यास कॅमेऱ्यात नेमके काय दिसणार, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्हीबरोबरच पुरेशी प्रकाशव्यवस्था असणेही आवश्यक आहे.

लाखो रुपये खर्च करून उद्यानाचे सुशोभीकरण केले जाते; मात्र, त्याची नियमित देखभाल होत नसेल, तर या खर्चाचा उपयोग काय, असा सवाल नागरिक विचारत आहेत. उद्यानाची देखभाल करणारे कर्मचारी तसेच संबंधित प्रशासनाचे याकडे लक्ष आहे की नाही, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांसह येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. बंद असलेले हायमास्ट दिवे तातडीने सुरू करावेत अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## स्व.अण्णासाहेबांना अभिवादन

**अलिबाग** : क्रांतिसूर्य स्व.अण्णासाहेब पाटील यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त रायगड येथील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकत मार्गदर्शन केद्र, रायगड या कार्यालयात (दि.१) ऑक्टोबर रोजी) त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

**कोणत्याही शासकीय अनुदानाशिवाय काम** | **तरुणांना गाईड प्रशिक्षणातून रोजगाराची मागणी**

# दौलतगडावर दुर्गसेवकांकडून संवर्धन मोहिम

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेला दौलतगड सध्या संवर्धन कार्यामुळे चर्चेत आला आहे. दौलतगड प्रतिष्ठान, दुर्गविश्व प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य,आणि रॉयल रायगडकर प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सातत्याने येथे स्वच्छता व संवर्धन मोहिमा अविरतपणे राबविल्या जात आहेत. नुकत्याच पार पडलेल्या मोहिमेत शंभरहून अधिक दुर्गसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

मोहिमेत मंदिर परिसर,



दुर्लक्षित प्राचीन तलाव, ढासळलेली तटबंदी, बुरुज आणि पाण्याच्या टाक्यांभोवती वाढलेली झाडे-झुडपे मुळासकट काढण्यात आली. विखुरलेले दगड पुन्हा रचून तटबंदीला बळकटी देण्यात आली. ही मोहिम कोणत्याही शासकीय अनुदानाशिवाय केवळ दुर्गसेवकांच्या स्वखर्चातून राबविल्या गेल्या आहेत.

सध्या गडावर जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने साहित्य वाहतुकीस आणि वृद्ध-महिला पर्यटकांना चढाईत अडचणी येतात. स्थानिक तरुणांना गाईड प्रशिक्षणातून रोजगार या मागण्या जोर धरू लागल्या आहेत. आगामी काळात मासिक मोहिमेतून मंदिर व तलावाचे बांधकाम पूर्ण करण्याचा निर्धार दुर्गसेवकांनी केला असून अधिकाधिक शिवप्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्रतिष्ठानने केले आहे. शासनाने वेळीच सहकार्य केल्यास हा दुर्लक्षित गड पर्यटन नकाशावर झळकून स्थानिक विकासाला निश्चितच नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

याप्रसंगी निलेश निवाते, श्रीकृष्ण पवार, सानिका सावंत, कर्तव्य जाधव यांच्यासह अनेक युवक, महिला व ज्येष्ठांनी वेळ आणि पैसा खर्च करून हा ऐतिहासिक ठेवा जतन केला आहे.

> मंदिर परिसर आणि तलावाची पूर्ण बांधणी करण्याचा संकल्प आहे. आतापर्यंत सर्व मोहिमा शासकीय मदत न घेता स्वखर्चातून केल्या आहेत. रस्ता, पाणी आणि तटबंदीची कामे बाकी आहेत. शासनाने मदत केली तर गड पुन्हा वैभवाने उभा राहील आणि स्थानिकांना रोजगार मिळेल.
>
> – निलेश निवाते, संस्थापक अध्यक्ष, दौलतगड प्रतिष्ठान

# मारहाण केल्याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा

**पनवेल :** पार्किंगच्या कारणावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देत मारहाण केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. अब्दुल रहीम याकूब सय्यद यांचे घरमालकाचा मुलगा मुजफ्फर शब्बीर शेख याच्यासोबत वाद झाला होता.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे भालिवडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक नारायण नथु गायकवाड यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|
| ०१ | १८/२ | ००.५७.४० या एकूण क्षेत्रापैकी ००.३०.०० | ६.३४ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून, ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०६ ऑक्टोबर २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे देवघर, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक धरती निलेश राऊत यांचे कडुन कायम मालकी हक्कने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| देवघर, ता. अलिबाग, जि. रायगड | २२५ | २-४८-३० जिरायत<br>०-०४-५० बागायत<br>०-०२-०० वरकस<br>०-४२-७० पो.ख.<br>२-९७-५० एकुण क्षेत्र | ५८.३१ |

वर नमुद जमिन मिळकतीपैकी असणारा धरती निलेश राऊत यांचा अविभक्त हिस्सा या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्मान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - ०५/१०/२०२६

**ॲड. राहूल रमेश नाईक**
मु. पो. नागांव,ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याच... ने– तन्मणी, चींचपेटी, ...गड्या,
बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या,
पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट–
मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची
कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि
भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**जाहीर सूचना**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या मध्यवर्ती वातानुकूलित यंत्रणेकरीता ३३ TR क्षमतेचा नवीन चिल्लर प्लांट स्थापित करून त्याची निगा, देखभाल व दुरूस्ती करणे कामाचे अंदाजपत्रक बनवण्याकरीता संबंधित Manufacturer/ Dealer / Contractor कडून वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे. सदरची माहिती https://panvelcorporation.maharashtra.gov.in/ या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र./पमपा/विद्युत/२७२६/प्र.क्र.०२/११७६/२०२६
दिनांक : ०५/१०/२०२६

सही/-
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

## मुरूड जंजिरा नगरपरिषद

म्यु.जा.क्र :- ६४९ दिनांक :- ५/१०/२०२६

**शुद्धीपत्रक**

मुरूड जंजिरा नगरपरिषद वतीने खालील कामे करण्याबाबत निविदा सुचना दिनांक ३०/०९/२०२६ अन्वये प्रकाशित करण्यात आली होती, सदर शुद्धीपत्रकान्वये खालील कामांची निविदा भरण्याची शेवटची सुधारित तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | कामाचे नाव | निविदा भरण्याची शेवटची सुधारित तारिख |
|---|---|---|
| १) | मुरूड जंजिरा नगरपरिषद हद्दीत सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणी बसविण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही कॅमेरांचे वार्षिक देखभाल दुरूस्ती करार करणे बाबत. | १४/१०/२०२६ |
| २) | मुरूड नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन जागेवरील weigh Bridge चे दुरूस्ती करणे बाबत. | १४/१०/२०२६ |

सही/-
**(सचिन बच्छाव)**
**मुख्याधिकारी**
**मुरूड जंजिरा नगरपरिषद**

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे खांडस, ता - कर्जत, जि - रायगड येथील शेती जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक- श्री लक्ष्मण रामा ऐनकर, रा- खांडस ता- कर्जत जि- रायगड पिन ४१०२०१ याची खालील वर्णन केलेली मौजे खांडस येथील जमीन मिळकत तीचे वर्णन

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ४८ | ३ | ला. योग्य क्षेत्र - ०.९१.००<br>पोट खराबा क्षेत्र - ०.०५.१०<br>एकुण क्षेत्र - ०.९६.१० हे.आर.पॉ<br>पैकी विकत देत असलेले क्षेत्र - ०.७६.०० हे.आर.पॉ | २.१९ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक लक्ष्मण रामा ऐनकर यांनी आमचे आशिलास सदर मिळकत कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात (७) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक ०६/०९/२०२६

**ॲड. भारत अंकुश सावंत**
(बी कॉम.एल.एल.बी)
पत्ता - मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

दिनांक : ०६ ऑक्टोबर २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे हेदवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मौजे हेदवली | २५ | ४ | १-३९-०० | १३ | ८७ |
| | यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-६०-०० मात्र. | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक : ०६/१०/२०२६

## सार्वजनिक सूचना

ही सूचना सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते की आमच्या ग्राहकांनी, शेतजमीन मिळकतीचे मालक यांच्याकडून शेतजमीन मिळकती खरेदी करणे आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**मौजे- तुकसई,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड, वर्ग -१**

| सर्वे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ (हे-आर.चौ.मी.) | | आकार (रु.पै.) | मालक |
|---|---|---|---|---|
| १४/२/अ | ००-२३-५० | खाता क्र. ७३ | २.६५ | श्री. हरिश्चंद्र विठ्ठल साळुंखे<br>श्रीमती द्रौपदी नारायण साळुंखे |
| १५/२/अ | ००-५५-३४ | खाता क्र. ७३ | ०.५५ | श्री. हरिश्चंद्र विठ्ठल साळुंखे |
| | एकुण ७८.८४ गुंठे | | | |

कोणत्याही व्यक्तीस वरील नमूद केलेल्या शेतजमीन विक्री, विनिमय, तारण, भार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, हक्क, परवाना, हायपोथिकेशन, मालकी हक्काचा हस्तांतरण, कोणत्याही ट्रस्टखालील लाभदायी हक्क, प्रिएम्शन हक्क, प्रथम खरेदी हक्क, करार, डिक्री, आदेश, निर्णय किंवा इतर कोणत्याही प्रकारे दावा, आक्षेप, स्वारस्य किंवा वाद असल्यास त्यांनी त्यांचे दावे/आक्षेप/वाद याबाबतची कागदपत्रे सादर करून या सूचनेच्या प्रकाशनापासून एकवीस (२१) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्याशी संपर्क साधावा. अन्यथा आमचे क्लायंट वरील मालकाशी व्यवहार पूर्ण करतील आणि नंतर कोणताही तृतीय पक्षाचा दावा/आक्षेप/वाद विचारात घेतला जाणार नाही.

Mr. Vishal Singh
For M/s V R legal & Co
कार्यालय क्र. २२५, थापर कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र.५१,
सेक्टर-१५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
संपर्क: +९१-९९२०३९०५९
ईमेल आयडी: adv.vrlegal@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे उणेगांव, ता.माणगांव, जि.रायगड येथे खालील वर्णनाची शेतजमिनीची मिळकत आहे.

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ६० | ६/अ | ०-२०-५०<br>पो.ख. ०-०२-८० | २.५० |

येणेप्रमाणे वर नमूद केलेल्या मिळकतीला यापुढे सदर जाहीर नोटीशीमध्ये सोयीकरीता ''सदर मिळकत'' असे संबोधिले आहे.

३) सदर मिळकत श्री.दिनेश दिनकर सत्वे व इतर सहहिस्सेदार यांचे ताबेकबजात, वहीवाटीत तसेच मालकी हक्कात आहे.

४) सदरची मिळकत निर्वेध व बोजारहीत श्री.दिनेश दिनकर सत्वे व इतर सहहिस्सेदार यांचे मालकीच्या, वहिवाटीच्या असल्याबद्दलची खात्री झालेली आहे. तरीही कोणाही त्रयस्थ व्यक्तिचा सदर मिळकतींमध्ये किंवा मिळकतींच्या एखाद्या भागात विरुद्ध कबजाने किंवा वारसा, गहाण, दान, विक्री, देणगी, लीज, चार्ज, ट्रस्ट, लायसन्स, पोटगी, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, वचनचिठ्ठी किंवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क असल्यास, त्यांनी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून तीन दिवसाच्या आत आपले प्रथमदर्शनी पुराव्याचे कागदपत्रांसहीत खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर्ड पोष्टाने दाखल कराव्यात.

५) वरील मुदतीत हरकती दाखल न झाल्यास, एखादा हक्क असल्यास तो रद्दबातल झाला आहे किंवा असल्यास जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे समजून वरील मिळकतीसंबंधी नियोजित खरेदीदार खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहुन कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीस श्री.दिनेश दिनकर सत्वे व इतर सहहिस्सेदार जबाबदार राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०५.१०.२०२६

सही
**श्री. चेतन आर म्हात्रे**
ॲडव्होकेट पनवेल
मंजुषा को.ऑप.हौ.सोसायटी, गार्डन हॉटेलच्या मागे,
एच. ओ.सी.कॉलनीसमोर, पनवेल रायगड.
मो.नं. ९५९४२४२०९२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नांदगाव ता.मुरूड, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.बेंजामिन मेनाशे चौलकर व श्री केरेन मेनाशे चौलकर यांचेकडुन खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबद्दल त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमच्या पक्षकारांस संमती दिली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | ग.नं./हि. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे नांदगाव ता. मुरूड | ९८१ | ००.५२.००<br>पो.ख. ००.०४.४०<br>एकुण ००.५६.४० | ११.०६ |

सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी वरील मिळकत निर्वेध असल्याबाबत हवाला दिला आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, दान, गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र व पुराव्या सहीत सादर कराव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून कुणाचाही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ०६/१०/२०२६

सही/-
**ॲड. मसिर अ. घोले**
३०५, सि-विंड बिल्डींग, सिद्धार्थ नगर जुने भाजी
मार्केट जवळ, अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड.
मो. ९८२३१३५५०१ ई मेल maseer1983@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. संजय जनार्दन गांधी व २. श्री. सतिश गणपत कोळवणकर रा. अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड. यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| वरंडे ता.अलिबाग | ८४ | ०-८१-३०<br>पो.ख. ०-०२-१०<br>एकूण ०-८३-४० | १.६८ |

वर नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीचे ०-४३-४० हे. आर. क्षेत्र, आकार ०.८५ रु. पैसे या मिळकतीपैकी ०-२०-०० हे. आर क्षेत्र हे या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचानंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :-०५/१०/२०२६

सही/-
**ॲड. आसावरी सु. घरत**
मु.पो. वरसोली, अलिबाग
अलिबाग - रायगड

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख रायगड क्र. २ मु. माणगाव यांचे कार्यालय
जुने तहसिल कार्यालयाचे आवारात, कचेरी रोड, माणगाव, जि. रायगड
पिनकोड ४०२ १०४
Email : dslr.raigad.mangaon@gmail.com

क्र.अपिल/एस.आर ४९/२०२६/ता. माणगाव/जि. रायगड/२०२६/१०१३ अलिबाग दि. ०१/१०/२०२६

**जाहीर नोटीस**

प्रति,
पुष्पलता नरेंद्र कुळकर्णी मयत तर्फे वारस
१. प्रदिप नरेंद्र कुळकर्णी — अपीलदार
मुळ रा. तळा, ता. तळा, जि. रायगड
सध्या रा. बी/८, ३०४ गजानन नगर, मोरेश्वर अपार्टमेंट
विटावा, कळवा, ठाणे कळवा, महाराष्ट्र ४००६०५
२. किशोर नरेंद्र कुळकर्णी
मुळ रा. तळा, ता. तळा, जि. रायगड
सध्या रा. प्लॉट नं. बी-१, स्मिता को.ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड,
गावदेवी, कळवा वेस्ट, ठाणे
विरुद्ध
१. भाई रामचंद्र कुळकर्णी
रा.मु. तळा, ता. तळा, जि. रायगड — जाबदार
२. उपअधिक्षक भूमि अभिलेख, तळा
ता. तळा, जि. रायगड

**विषय :-** मौजे तळा, ता. तळा, जि. रायगड येथील सि.स.नं. ३८४ या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत

**संदर्भ :-** १. अर्जदार श्री. प्रदीप नरेंद्र कुळकर्णी यांचा दि. २३/०१/२०२६ रोजीचा अपिल अर्ज.
२. इकडील नोटीस क्र.अपील क्र. ४९/२०२६/जा.क्र.७८७ दि. २८/०७/२०२६

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत याबाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपीलाच्या विलंब माफी अर्जावरील सुनावणीची तारीख ०१.०६.२०२६, ०८.०६.२०२६, १५.०६.२०२६, २२.०६.२०२६, २९.०६.२०२६, ०६.०७.२०२६, १४.०७.२०२६, २१.०७.२०२६, २८.०७.२०२६, ०४.०८.२०२६ व ११.०८.२०२६ रोजी नेमणेत आलेली होती. त्याची जाबदार हे सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहीर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार क्र.१ यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून पुढील सुनावणी दिनांक २१/१०/२०२६ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी दुपारी १२.३० वाजता आपण पुराव्याचे मूळ कागदपत्रांसह जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख रायगड क्र.२ मु. माणगाव, जुने तहसिल कार्यालयाचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही. असे समजून आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १/१०/२०२६

सही/-
**सुनील इंदुलकर**
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख
रायगड क्र.२ माणगाव

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली श्रीमती कमला प्रकाश जैन पत्ता :-W/O प्रकाश हस्तिमल जैन, आनंदी अपार्टमेंट, रूम नं.३०१, मु.पो. रोहा, तालुका रोहा, जिल्हा रायगड यांच्या एकमेव मालकीची वहिवाटीची व ताबे कब्जातील सर्व्हे क्र./गट क्र.३२९, भोगवटदार वर्ग. १, ला.यो.०-४३-६०, पो.ख. ०-०४-०० एकुण क्षेत्र ०-४७-६० (या संपुर्ण क्षेत्रासाठी मालकी हक्क असणारी) शेतजमिन मिळकत खरेदी करण्याचा व्यवहार निश्चित केला आहे. सदर जमिन मालक व त्यांच्या जमिनीचे तपशीलवार वर्णन खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | शेतकऱ्याचे नाव | गावाचे नाव | सर्व्हे क्र. /गट क्र. | क्षेत्र हे.आर.प्र. |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती कमला प्रकाश जैन | मौजे. पिंगळसई, तालुका. रोहा, जि. रायगड | ३२९ भोगवटादार वर्ग -१ | ला.यो. ०-४३-६० पो.ख. ०-०४-०० |
| | | | एकूण क्षेत्र | ०-४७-६० |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही खरेदी विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस, हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहीवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क अथवा वाद अधिकार हितसंबंध कोर्टाची जप्ती, हुकूमनामा किंवा कायदेशीर दावा असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत खालील सही करणार त्यांचे खाली नमूद पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत सादर करून पोहोच पावती घ्यावी जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत अथवा तक्रार प्राप्त न झाल्यास सदरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही हक्क, हितसंबंध, बोजा अधिकार स्वारस्य, आक्षेप वाद व दावा नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे. तसेच सदरहू जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती तक्रार ढावा, आक्षेप, रद्द/त्यागलेला आहे असे समजण्यात येऊन, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

दिनांक :- ०३/१०/२०२६

सही/-
**ॲड. रोहित जितेंद्र भानुशाली**
वकील, मुंबई उच्च न्यायालय
C/O पत्ता :-९०९, मयुरेश स्केअर,
सेक्टर.१५, प्लॉट क्र. १७, सीबीडी
बेलापूर नवी, मुंबई ४००६१४
मोबाईल क्रमांक ७७१०८७६७८३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नांदगाव ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.राम दामोदर धार्वे, श्री शाम दामोदर धार्वे व श्री राजंता राम धार्वे यांचेकडुन खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबद्दल त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमच्या पक्षकारांस संमती दिली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | ग. नं./हि. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे नांदगाव ता. मुरूड | ४८२ | ०:९४:२०<br>पो. ख. ०:००:८०<br>एकुण ०:९५:०० | २०.४० |

(सदर मिळकतीमधील श्री. राम दामोदर धार्वे व श्री शाम दामोदर धार्वे यांचे नावे असलेली ००.८१.२० हे. आर. पो. ख. ००.००.८० हे. आर. आकार १७.८५ रू. पै. हि बागायत मिळकत व सदर मिळकतीमध्ये ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव येथील मालमत्ता नं. १०० हे २९५८ चौ. फुट. बिल्टअप' क्षेत्राचे घर आणि श्री राजंता राम धार्वे यांचे नावे असलेले मालमत्ता नं.१४३९ हे १६१० चौ. फुट. बिल्टअप' क्षेत्राचे घर)

सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी वरील मिळकत निर्वेध असल्याबाबत हवाला दिला आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, दान गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र व पुराव्यासहीत सादर करावयात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून कुणाचाही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक ०६/१०/२०२६

सही/-
**ॲड. अभिषेक महेश पिसाट**
३, अलिबाग कमर्शिल कॉप्लेक्स, बिग स्प्लॅश
हॉटेल शेजारी, ता. अलिबाग जि. रायगड.
मो. ९५९५०३२३२० ई मेल abhipisat@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली श्री.सतविंदरसिंग सोहनसिंग पाबला, पत्ता:-रा. १०२, बिल्डिंग नं. २, धवलगिरी कॉम्प्लेक्स, प्लॉट नं १०४, ठाणा नाका, पेसपार्क जवळ, मुंबई पुणे हायवे, पनवेल, तालुका पनवेल, जि. रायगड यांच्या एकमेव मालकीची वहिवाटीची व ताबे कब्जातील सर्व्हे क्र./ गट क्र. २९७/५, भोगवटदार वर्ग. १, ला. यो. ०-५७-३०, पो.ख. ०-११-१० एकुण क्षेत्र ०-६८-४० पैकी खरेदी क्षेत्र ०-३०-००, (या संपुर्ण क्षेत्रासाठी मालकी हक्क असणारी) शेतजमिन मिळकत खरेदी करण्याचा व्यवहार निश्चित केला आहे. सदर जमिन मालक व त्यांच्या जमिनीचे तपशीलवार वर्णन खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | शेतकऱ्याचे नाव | गावाचे नाव | सर्व्हे क्र. /गट क्र. | क्षेत्र हे.आर.प्र. |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. सतविंदरसिंग सोहनसिंग पाबला | मौजे. मौजे. पिंगळसई, तालुका. रोहा, जि. रायगड | २९७/५ भोगवटादार वर्ग -१ | ला.यो. ०-५७-३० पो.ख. ०-११-१० एकुण क्षेत्र ०-६८-४० पैकी खरेदी क्षेत्र ०-३०-०० |
| | | | एकूण क्षेत्र | ०-३०-०० |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही खरेदी विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस, हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहीवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क अथवा वाद अधिकार हितसंबंध कोर्टाची जप्ती, हुकूमनामा किंवा कायदेशीर दावा असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत खालील सही करणार त्यांचे खाली नमूद पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत सादर करून पोहोच पावती घ्यावी जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत अथवा तक्रार प्राप्त न झाल्यास सदरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही हक्क, हितसंबंध, बोजा अधिकार स्वारस्य, आक्षेप वाद व दावा नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे. तसेच सदरहू जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती तक्रार ढावा, आक्षेप, रद्द/त्यागलेला आहे असे समजण्यात येऊन, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

दिनांक :- ०३/१०/२०२६

सही/-
**ॲड. रोहित जितेंद्र भानुशाली**
वकील, मुंबई उच्च न्यायालय C/O
पत्ता :- ९०९, मयुरेश स्केअर,
सेक्टर.१५, प्लॉट क्र. १७, सीबीडी
बेलापूर नवी, मुंबई ४००६१४
मोबाईल क्रमांक ७७१०८७६७८३

विनायक दळवी

# मृत्यूच्या दाढेतून परतलेली नीरू धांडा



प्रशिक्षक नेमबाज मनशेरसिंग म्हणतात काही खेळाडूंना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षकालाच प्रेरणा मिळत असते. अशीच प्रेरणा असलेली नुकतेच आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणारी निरू धांडा हिच्याविषयी मनशेर सिंग यांनी व्यक्त केलेलं मनोगत.

देण्यासाठी आणखी एक तरुण मुलगी आहे जी आता आशियाई चॅम्पियन झाली आहे. नीरू धांडा, तिचं नाव... मला वाटतं, मी प्रशिक्षण दिलेल्या सर्वात प्रतिभावान नेमबाजांपैकी ती एक आहे. ती अकादमीमध्ये दाखल झाली आणि मग कोविड आला. ती घरी परत गेली आणि तिला कोविड झाला. तिच्या बहिणीने मला रडत फोन केला, 'मी काय करू?' मी म्हणालो, 'तिला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये घेऊन जा, जिथे ती राहते त्याच्या जवळ.' आणि... आम्ही तिला हॉस्पिटलमध्ये दाखल तर केलं पण.. ती आम्हाला १० दिवस सापडली नाही. आम्हाला वाटलं की तिचा मृत्यू झाला आहे, जणू काही तिच्यासोबत काहीतरी घडलं होतं. मग, आम्ही सगळ्यांना फोन करायला सुरुवात केली, डीएमना शोधून काढलं. डीएमकडून, आम्ही एका राजकारण्याला गाठलं, ज्याला ती कुठेतरी एका पलंगावर अत्यंत दयनीय अवस्थेत पडलेली आढळली. तिला तिथून बाहेर काढलं आणि चंदीगडमध्ये तिला योग्य वैद्यकीय मदत मिळवून दिली. मग, मानसशास्त्रज्ञांना यात सामील व्हावं लागलं, कारण कोविडच्या काळात तिच्यासोबत जे काही घडलं होतं त्यामुळे तिला खूप मोठा मानसिक धक्का बसला होता. म्हणून, आम्ही तिला तो सर्व आधार मिळवून दिला. तिला पुन्हा अकादमीमध्ये दाखल केलं. मी तिला सतत सांगत असतो की, हे एका ध्येयासाठी घडलं. तू त्या सर्व त्रासातून गेलीस कारण एक दिवस तू असं काहीतरी अद्भुत करून दाखवशील की तू म्हणशील की देवाने, मला एका मोठ्या कारणासाठी मरण्यापासून वाचवलं. मला वाटतं, मी तिला फक्त प्रशिक्षण देतो म्हणून नाही, पण मला वाटतं की तिच्या आयुष्यात बदल घडवणाऱ्या अनुभवांमुळे, ती कदाचित सध्याच्या नेमबाजांच्या गटात, शॉटगनच्या अंतिम फेरीत मी पाहिलेली सर्वात मजबूत नेमबाज बनली आहे. तुम्हाला माहीत आहे, या अशा कथा आहेत ज्या कधीकधी आपल्याला सांगतात की एक यशस्वी खेळाडू बनण्यासाठी यापेक्षाही खूप काही गोष्टींची आवश्यकता असते. आणि मुली, कधीकधी जेव्हा या संकटांमधून जातात, तेव्हा त्या पुरुषांपेक्षा खूपच जास्त कणखर असतात आणि त्या उत्कृष्ट परिणाम साधतात, कारण त्यांच्याकडे ती भावनिक इच्छाशक्ती असते जी कधीकधी खंबीर पुरुषांमध्येही नसते. मनशेर सिंग स्वतः अनेक कटू अनुभवातून गेलेले आहेत. मात्र त्यांनी नीरूमध्ये दुर्दम्य इच्छाशक्ती जागवून तिला सुवर्णपदकापर्यंत नेलं. तिच्यावर ओढावलेल्या कटू आठवणींचा योग्य वापर करून, तिला एक आगळी वेगळी नेमबाज म्हणून तमाम विश्वासमोर उभं केलं. सलाम मनशेर सिंग सारख्या प्रशिक्षकांना.

# भारताला ८५ पदकांचा मान, सायोनारा जपान!

## नेमबाज नीरू धांडा ध्वजवाहक | एशियाडमध्ये भारताची दमदार कामगिरी



**। नागोया । वृत्तसंस्था ।**

भव्यदिव्य, नेत्रदीपक अशा कार्यक्रमासह एशियन गेम्स २०२६ चा सांगता सोहळा रविवारी पार पडला. दोहा येथे २०३० साली एशियन गेम्स स्पर्धा पार पडतील. या सांगता समारंभात भारताच्या वतीने शूटिंगमध्ये दोन सुवर्णपदकासमवेत तीन मेडल जिंकणाऱ्या नीरू धांडाला ध्वजवाहकाचा मान देण्यात आला होता.

नागोयाच्या मिजुहो पार्क ॲथलेटिक स्टेडियममध्ये झालेल्या एशियन गेम्स २०२६ च्या सांगता सोहळा जपानच्या राष्ट्रगीताने संपन्न झाला. यंदाच्या स्पर्धेत भारताची शानदार कामगिरी राहिली. देशाने एकूण ८५ पदक जिंकले, ज्यात २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य पदकांचा समावेश होता. पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानी राहिला. तर चीनने एकूण ३४१ पदकांसह अव्वल स्थान प्राप्त केले. यात १६९ सुवर्ण, ८९ रौप्य आणि ८३ कांस्य पदकांचा समावेश होता. यजमान जपान २६९ पदकांसह दुसऱ्या स्थानी राहिला. ज्यात ८३ सुवर्ण, ९५ रौप्य व ९१ कांस्य पदक होती. साउथ कोरियाने १५० पदक पटकावली, ज्यात ३९ सुवर्ण, ४३ रौप्य व ६८ कांस्य पदकाचा समावेश आहे. उज्बेकिस्तान ७० पदकांसह पाचव्या स्थानी राहिला.

भारताला आर्चरीत शानदार पाच पदक मिळाली. बॉक्सिंगमध्ये तीन आणि रेसलिंगमध्ये दोन गोल मेडल जिंकले. हॉकी आणि कबड्डी संघात तोच जुना जोश पाहण्यास मिळाला, ज्यात पुरुष आणि महिलांच्या संघांनी सुवर्ण कामगिरी केली. भारतीय महिला आणि पुरुष क्रिकेट संघांनीही सर्वोत्तम कामगिरी करत सुवर्ण पदकांची संख्या वाढवली.

ॲथलेटिक्समध्येही रोमहर्षक स्पर्धा पाहण्यास मिळाल्या, जिथे भारताच्या धावपटू आणि फिल्ड ॲथलेटिक्सचा दबदबा होता. त्यांनी वातावरणाचा सामना करताना उत्तुंग कामगिरी केली.

गोल्फमध्येही भारताने इतिहास रचला, प्रणवी उर्सने खेळात भारतासाठी महिलांमध्ये पहिले वैयक्तिक एशियन गेम्सचे सुवर्ण पदक पटकावले. शूटिंग भारताला पदक जिंकून देणाऱ्या सर्वात बळकट खेळांपैकी एक राहिला, जिथे वेटलिफ्टिंग, बॅडमिंटन, स्क्वॅश, रोइग, टेबल टेनिस, सेलिंग, वुशु, कुराश, एमएमए, सॉफ्ट टेनिस आणि दुसऱ्या खेळांनीही काही मेडल प्राप्त केले.

## जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत आर्या भोईरचे घवघवीत यश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नागाव येथील पी. एन. पी. सायरसपूनावालास्कूलची विद्यार्थिनी आर्या कृष्णा भोईर हिने जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. रसायनी येथील एचओसी कॉलनीतील पिल्लई महाविद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत आर्या हिने ३००० मीटर धावणे आणि ४००० मीटर क्रॉस कंट्री या दोन्ही स्पर्धांमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तिची मुंबई विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. आर्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पी. एन. पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी तिचे विशेष कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका गीतिका भूचर, क्रीडाशिक्षक राकेश म्हात्रे, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आर्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले. आगामी मुंबई विभागीयस्पर्धेसाठी तिला शुभेच्छा देत तिच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. आर्याच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत मानाची भर पडली असून तिच्या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



- **३००० मीटर धावणे, ४००० मीटर क्रॉस कंट्री स्पर्धेत द्वितीय क्रमांक**
- **मुंबई विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड**

## जिल्हा जलतरण स्पर्धा
# सांची मुंडेची सुवर्णझेप!

**१००, ४०० आणि ८०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये तीन सुवर्णपदकांची कमाई**



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

अशोकदादा साबळे विद्यालय व माणगाव ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी सांची शिवशंकर मुंडे हिने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत तब्बल तीन सुवर्णपदकांवर आपले नाव कोरून देदिप्यमान यश संपादन केले आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने आयोजित शालेय जिल्हास्तरीय जलतरण क्रीडा स्पर्धा बी. टी. स्पोर्ट्स अकादमी व मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई स्कूल, माणगाव, रायगड येथे उत्साहात पार पडल्या. रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून सुमारे २०० जलतरणपटू विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेतील १९ वर्षांखालील मुलींच्या गटात सांची मुंडे हिने १०० मीटर फ्रीस्टाईल, ४०० मीटर फ्रीस्टाईल आणि ८०० मीटर फ्रीस्टाईल या तिन्ही प्रकारांत दमदार कामगिरी करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. या तीन सुवर्णपदकांमुळे तिच्या क्रीडाक्षेत्रातील गुणवत्तेची आणि अथक परिश्रमांची पुन्हा एकदा प्रचिती आली. सांची सध्या इयत्ता बारावी विज्ञान शाखेत शिक्षण घेत असून शिक्षणासोबतच जलतरणाचा सराव अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करत आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे मुंबई येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील जलतरण स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. ती बी. टी. स्पोर्ट्स अकादमीमध्ये आंतरराष्ट्रीय जलतरणपटू आरती दळवी व अभिनंदन दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे.

# सागरी सुरक्षा जनजागृतीसाठी बीच कबड्डी स्पर्धा



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

ऐतिहासिक मुरूड नगरीतील परेश नाका परिसरातील समुद्रकिनारी रायगड जिल्हा पोलिसांच्या वतीने रायगड सुरक्षा चषक २०२६ कबड्डी साखळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सागरी सुरक्षा दलातील जवान आणि मच्छिमार बांधवांमध्ये सागरी सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या मुख्य उद्देशाने या बीच कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या संकल्पनेतून तसेच मुरूड, तळा आणि रोहा या सागरी पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे आयोजन मुरूड पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले असून, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडत आहे.या स्पर्धेत महिला गटात मुरूड आणि रोहा संघ सहभागी झाले असून, पुरुष गटात मुरूड, रोहा आणि तळा या तीन संघांमध्ये चुरशीचे सामने रंगणार आहेत. स्पर्धेचा अंतिम सामना १० ऑक्टोबर रोजी अलिबाग येथे होणार आहे. स्पर्धेतील विजेत्या संघाला ५१ हजार रुपये, उपविजेत्या संघाला ३१ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकाच्या संघाला २१ हजार रुपये रोख पारितोषिक व चषक देण्यात येणार आहे.

स्पर्धेचा शुभारंभ कोस्ट गार्ड अधिकारी अभिषेक करुणाकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आला. पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर श्रीफळ वाढवून सामन्याचे उद्घाटन करण्यात आले. उपस्थित सर्व खेळाडूंना सागरी सुरक्षा आणि क्रीडा शिस्तीची शपथ देण्यात आली.स्पर्धे साठी पंच म्हणून अमोल नलावडे आणि नितीन समजीसकर यांनी जबाबदारी सांभाळली. पंचायत समितीच्या उपसभापती अश्विनी जंगम यांच्या शुभहस्ते नाणेफेक करण्यात आली.

यावेळी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, ताबीश ढाकम, पोलीस मकरंद पाटील, पोलीस नाईक किशोर बठारे, रायगड जिल्हा पोलीस क्रीडा प्रमुख ऋषिकेश साखरकर, कोस्ट गार्ड अधिकारी अभिषेक करुणाकर, श्रीकांत खोत, निवृत्त पोलीस उपनिरीक्षक दीपक राऊळ, विश्वनाथ पाटील, राष्ट्रीय खेळाडू संजय मोकल, मारुती म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.समुद्रकिनारी रंगणाऱ्या या अनोख्या कबड्डी स्पर्धेमुळे क्रीडा क्षेत्राला चालना मिळण्याबरोबरच सागरी सुरक्षा, मच्छिमार बांधव आणि सुरक्षा यंत्रणांमधील समन्वयाबाबत जनजागृती होण्यास मदत होत आहे. रायगड सुरक्षा चषक २०२६ हा उपक्रम क्रीडा आणि सागरी सुरक्षा जनजागृतीचा अनोखा संगम ठरत आहे.

## एकल गायन स्पर्धेत प्रथमेश दोडेकर प्रथम

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

बालरंगभूमी परिषदेतर्फे आयोजित जल्लोष लोककलेचा या उपक्रमांतर्गत झालेल्या राज्यस्तरीय एकल गायन स्पर्धेत प्रथमेश दोडेकर याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्याच्या विविध भागांतून आलेल्या स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. प्रथमेशने आपल्या प्रभावी आणि सादरीकरणाने परीक्षकांची मने जिंकत अव्वल स्थान मिळविले. प्रथमेशच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनेत्री नीलम शिर्के-सामंत, मंगेश बोरगावकर, लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## नियती देसाईचे हॅमर थ्रोमध्ये अव्वल

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मेहनत, जिद्द आणि आत्म विश्वासाच्या जोरावर माणगावच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. अशोकदादा साबळे विद्यालय व माणगाव ज्युनिअर कॉलेज, माणगाव येथील इयत्ता बारावी विज्ञान शाखेची विद्यार्थीनी कुमारी नियती सचिन देसाई हिने जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत हॅमर थ्रोमध्ये १९.५० मीटरची भक्कम कामगिरी करत रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे तिची आगामी मुंबई येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने आयोजित शालेय जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धा २ व ३ ऑक्टोबर २०२६ रोजी रसायनी, मोहपाडा येथे पार पडल्या. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या हॅमर थ्रो प्रकारात नियतीने १९.५० मीटर अंतरावर हॅमर फेकून सर्वांना मागे टाकत जिल्ह्यात अव्वल स्थान मिळवले.



## रेवदंडा समुद्र चौपाटीवर कबड्डीचा थरार

**रेवदंडा** : रायगड जिल्हा पोलीस सागरी सुरक्षा चषक कबड्डी स्पर्धेतील साखळी सामने रेवदंडा समुद्र चौपाटीवर खेळविण्यात आले. यामध्ये अलिबाग, पोयनाड, रेवदंडा व नागोठणे पोलीस ठाणे अंतर्गत सागरी सुरक्षा दल संघाचे साखळी सामने खेळविण्यात येत आहेत.यामध्ये अलिबाग, पोयनाड, रेवदंडा व नागोठणे पोलीस ठाणे अंतर्गत संघाचे साखळी सामने,तर महिला गटात पोयनाड व नागोठणे पोलीस ठाणे अंतर्गत सामने खेळविण्यात आले. साखळी सामन्यातून गुणात्मक पद्धतीने गटविजेते ठरणाऱ्या ४ संघात सदर स्पर्धेची अंतिम लढत होणार आहे. रेवदंडा चौपाटी येथील कबड्डी महिला व पुरूष गटाच्या साखळी स्पर्धेस सायकांळी साडेपाच वाजता प्रारंभ झाला. रायगडचे अप्पर पोलीस अधिक्षक अभिजीत शिवथरे यांचे शुभहस्ते श्रीफळ वाढवून साखळी कबड्डी स्पर्धेचा शुभारंभ झाला.




## राज्य मानांकन कॅरम स्पर्धा | अग्रमानांकीत अभिजीतचीही आगेकूच
# सोनालीची अंबिकावर पुन्हा मात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सारस्वत ब्राम्हण समाज, मुंबई यांच्यावतीने आणि महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने शांती निवास वातानुकूलित हॉल, चर्नी रोड (पूर्व), मुंबई येथे सुरु असलेल्या पहिल्या सारस्वत ब्राम्हण समाज राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत महिला एकेरीच्या उप उपांत्य फेरीत मुंबईच्या सोनाली कुमारीने मुंबईच्याच अंबिका हरिथवर सरळ दोन सेटमध्ये १८-१७ व २०-१२ अशी मात करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.



सोनालीचे दमदार कमबॅक

नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धेत महाराष्ट्राकडून खेळणाऱ्या सोनालीने अंबिका हरिथला सरळ दोन सेटमध्ये हरवल्याचा स्पष्ट व्हिडीओ पुरावा असतानाही रिझर्व्ह बँकेची अंबिका जिंकल्याचा निर्णय दिला होता.

यामुळे सोनालीचे विश्व अजिंक्यपद स्पर्धा खेळण्याची संधी हुकली आणि तिचे फार मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे या सामन्यावर कॅरम रसिकांची विशेष नजर होती. या चुकीच्या निर्णयाची सोनालीने परतफेड केली.

पुरुष एकेरी गटाच्या रंगतदार उप उपांत्य फेरीत पुण्याच्या अभिजित त्रिपनकरने मुंबईच्या अनुभवी संजय मांडेला २५-१०, १७-२२ व २०-१६ असे तीन सेटमध्ये हरवले. इतर सामन्यात निलांश चिपळूणकरने मुनियप्पन राजाचा २५-६, २२-२५, २५-३ असा, प्रशांत मोरेने रिझवान शेखचा २२-२०, २४-०४ असा, तर महम्मद घुफ्रानने योगेश परदेशीचा २३-१०, २५-२१ असा पराभव केला.

तसेच महिला एकेरीच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात अंजली सिरीपुरमने नीलम घोडकेचा २५-१, २५-९ असा, केशर निर्गुणने रिंकी कुमारीचा २३-७, २५-८ असा आणि मिताली पाठकने उर्मिला शेंडगेचा २५-११, २१-१० असा पराभव करत आगेकूच केली.

आता स्पर्धा रंगतदार वळणावर आली असून आगामी काळात अखेरच्या सामन्यांचा थरार पाहण्यास मिळणार आहे.

## शेष भारताची इराणी चषकावर मोहोर

**। श्रीनगर । वृत्तसंस्था ।**

वेगवान गोलंदाज मुकेश कुमार आणि आकाश दीप यांच्या प्रभावी गोलंदाजीच्या जोरावर शेष भारताने रणजी करंडक विजेत्या जम्मू-काश्मीरचा १६७ धावांनी पराभव करत रविवारी इराणी कप जिंकला. कर्णधार ऋषभ पंतच्या वाढदिवशीच त्याच्या नेतृत्वात शेष भारताने जेतेपद मिळवले. चौथ्या दिवशी विजयासाठी २७९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना जम्मू-काश्मीरचा संघ १११ धावांवर सर्वबाद झाला. जम्मू-काश्मीरला सामना अनिर्णित राखून पहिल्या डावातील ४१ धावांच्या आघाडीच्या बळावर विजेतपद मिळवण्यासाठी खेळपट्टीवर टिकून राहायचे होते, परंतु मुकेशने ३३ धावा देत ६ बळी टिपत आणि आकाशने २ बळी घेत त्यांच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले.

# पीएनपीचे विद्यार्थी मुंबई विभागीय स्पर्धेसाठी सज्ज

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिल्हा क्रीडा अधिकारी अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने व एचओसीएल रसायनी खालापूर शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा २०२६/२०२७आयोजित करण्यात आली होती सदर स्पर्धेमध्ये पीएनपी माध्यमिक शाळा वेश्वी अलिबाग शाळेतील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश संपादन केले.

सदर स्पर्धांमध्ये १४ वर्षाखालील मुले यामध्ये विशाल संतोष पवार थाळी फेक प्रथम क्रमांक, १७ वर्षाखालील मुले राज कल्पेश म्हात्रे थाळी फेक प्रथम क्रमांक, १४ वर्षाखालील मुले विशाल संतोष पवार ८० मीटर हार्डल्स द्वितीय क्रमांक मिळवून त्यांची मुंबई विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या नेत्रदीपक यशाबद्दल पी.एन.पी. संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, माध्यमिक शाळा वेश्वीचे मुख्याध्यापक निलेश मगर, क्रीडा प्रशिक्षक चेतन पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



## निखिलची फुल मॅरेथॉनकडे वाटचाल!

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

निखिल पवार यांनी तब्बल ५० हाफ मॅरेथॉन पूर्ण करण्याचा उल्लेखनीय टप्पा गाठला आहे. मुंबई येथे झालेल्या सेखोन इंडिया एअर फोर्स हाफ मॅरेथॉन मुंबई २०२६ मध्ये निखिल यांनी २१ किलोमीटरचे अंतर २ तास १५ मिनिटांत पूर्ण केले. विशेष म्हणजे, ही धाव त्यांनी वेगाची शर्यत म्हणून नव्हे, तर Easy Run म्हणून पूर्ण केली. त्यांच्या मते, वेगापेक्षा सातत्य महत्त्वाचे. प्रत्येक किलोमीटरसोबत स्वतःला आणखी मजबूत करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू असून आता ४२.२ किलोमीटरच्या फुल मॅरेथॉनचे लक्ष्य त्यांनी समोर ठेवले आहे.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)